कृषीवल
रायगड, मंगळवार, दि. ५ ऑगस्ट २०२५
किंमत ४ ₹

## नेरळमधील वयोवृद्धाची आत्महत्या

**नेरळ :** येथील पाडा भागात असलेल्या राजबाग गृहनिर्माण सोसायटीत राहणाऱ्या एका वृद्धाने जीवनाला कंटाळून तलावात उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. नैराश्यातून आपले जीवन संपवत असल्याची चिठ्ठी स्वतःच्या खिशात ठेवून आत्महत्या केली असून, त्या वृद्धाचे वय ७५ वर्षे इतके होते. पाडा विभागातील राजबाग गृहनिर्माण सोसायटीत राहणारे जनार्दन नारायण गायकवाड हे येथील १२ नंबर बिल्डिंगमध्ये राहत होते. त्यांनी नेरळ गावातील राजमाता जिजामाता तलाव येथील पाण्यात उडी घेऊन पान २ वर

## अल्पवयीन इराणी चोरट्याचा हैदोस

**कल्याण :** लोकलच्या दारात उभे असताना रुळांलगत असलेल्या चोरट्यांकडून फटका मारुन मोबाईल हिसकावण्याचे प्रकार मध्य रेल्वेवर पुन्हा वाढले आहेत. त्यामुळे रेल्वेच्या प्रवाशांमध्ये 'फटका गँग'ची मोठी दहशत निर्माण झाली आहे. अशातच रविवारी नाशिकच्या एका तरुणाचा फटका गँगमुळे पाय मोडला. तपोवन एक्स्प्रेसने प्रवास करत असताना एका चोरट्याने फटका मारुन मोबाईल हिसकावण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात तरुण एक्स्प्रेसमधून खाली पडला. चोरट्याने रुळांशेजारी पडलेल्या तरुणाला माराहाण करुन त्याच्याकडील पैसे आणि मोबाईल पान २ वर

### वाढीव मोबदल्यासाठी

# सांबरकुंड प्रकल्पग्रस्त त्रस्त

### आठ दिवसांत मागणीचा विचार न झाल्यास जमिनी देणार नसल्याचे अपर जिल्हाधिकारी थोरवे यांना निवेदन

| अलिबाग | प्रतिनिधी |

**अलिबाग तालुक्यातील रामराज ग्रामपंचायत हद्दीतील महान परिसरातील सांबरकूंड मध्यम प्रकल्प उभारण्याच्या प्रशासकीय हालचाली सुरु झाल्या आहेत. मात्र, अजूनपर्यंत प्रकल्पग्रस्त व शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य मोबदला देण्यात आला नाही. शासनाकडून फक्त आश्वासन देण्यात आली आहेत. त्यामुळे संतप्त झालेल्या प्रकल्पग्रस्तांनी हेक्टरी दोन कोटीहून अधिक वाढीव मोबदला मिळावा, अशी मागणी केली आहे. आठ दिवसांत मागणीचा विचार न झाल्यास जमीनी देणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. याबाबत सोमवारी (दि.४) अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांना निवेदन दिले आहे.**



**सांबरकुंड (धरण) प्रकल्पावर दृष्टीक्षेप**

प्रकल्पाची अंदाजे किंमत 2,00,00,000 रुपये

प्रकल्पाची लांबी 730.59 मीटर

प्रकल्पाची उंची 38.78 मीटर

बाधीत कुटूंब 230

विस्थापित गावे - तीन (जांभुळवाडी, खैरवाडी, सांबरकुंडवाडी)

रायगड जिल्ह्यातील महान–रामराज परिसरातील सांबरकुंड महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. गेल्या ४० वर्षापासून हा प्रकल्प रखडला आहे. मात्र, सरकारकडून कोणतीही ठोस भूमिका न घेतल्याचा फटका प्रकल्पग्रस्त व शेतकऱ्यांना बसत आहे. यापूर्वी हा प्रकल्प ७०० कोटी हून अधिक रुपयांचा होता. आता हा प्रकल्प २ हजार कोटीपर्यंत पोहचला आहे. या प्रकल्पात २३० कुटुंब बाधीत होणार आहेत. जांभुळवाडी, खैरवाडी, सांबरकुंडवाडी ही तीन गावे विस्थापित होणार आहेत. त्यात ८० शेतकऱ्यांचा समावेश असून इतर शेतमजूर बाधीत आहेत.



भुसंपादन कायदा १८९४ नुसार, निवाडा घोषित करण्यात आला. परंतु, भरपाई देण्यास शासनाकडे पैसे नसल्याने ती रक्कम देण्यास सरकार अपयशी ठरले. सुधारित २०१३ च्या कायद्याप्रमाणे दर निश्चित करून पान २ वर

> **"एकदा निवाड झाल्यावर शासनाच्या नियमाप्रमाणे पुन्हा निवाडा घेता येत नाही. मात्र, प्रकल्पग्रस्त व शेतकरी यांची भूमिका सरकारकडे मांडली आहे. याबाबत राज्यस्तरावर बैठकही झाली आहे. पुनर्वसनाबाबत लवकरच बैठक उपविभागीय अधिकारी यांना सुचना केली आहे."**
> **– सुनील थोरवे, अपर जिल्हाधिकारी, रायगड**

> **"सांबरकुंड हा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पा कुठल्याही प्रकारचा निर्णय देण्यात आला नाही. २०१३ च्या कायद्यानुसार शेतकऱ्यांना मोबदला मिळावा अशी मागणी आहे. मात्र, त्याबाबत शासनाकडून कोणतीही भुमिका दिसून आली नाही. प्रशासन परस्पर काय निर्णय घेतात. प्रकल्पग्रस्तांना विश्वासात घेतले जात नाही. प्रशासन व सरकार वागत असेल, तर आम्ही जमीन देणार नाही, अशी आम्ही भुमिका घेतली आहे."**
> **– उल्हास चाचड, प्रकल्पग्रस्त, शेतकरी**

## बंदीत चेअरमनची बोट मासेमारीवर

- **प्रदिप नाखवा यांची कबुली**
- **मत्स्यविभागातील अधिकाऱ्यांच्या कारभाराबाबत अविश्वास**

| उरण | प्रतिनिधी |

करंजा मच्छिमार सहकारी सोसायटीचे चेअरमन प्रदीप नाखवा यांनी स्वतःची मासेमारी बोट पावसाळी बंदीच्या काळात, म्हणजेच दि. १७ जुलै रोजी समुद्रात पाठवली असल्याची स्पष्ट कबुली दिली आहे. या मासेमारीत किती मासळी मिळाली, ती कोणत्या दराने विकली गेली, त्यात खर्च व नफा किती झाला, याचे तपशीलदेखील खुद्द चेअरमन यांनी लेखी स्वरूपात सादर केले आहेत.





बंदीकाळातील मासेमारी मत्स्यविभागातील काही अधिकाऱ्यांच्या आर्थिक देवघेव व संगनमतातूनच सुरू असल्याची माहिती करंजा येथील कोळी समाजातील काही स्थानिकांनी दिली आहे. त्यामुळे पावसाळी बंदी असतानाही काही विशेष बोटी व व्यक्तींना सूट देण्यात आल्याचा संशय आता स्पष्ट होत चालला आहे.

दरम्यान, मत्स्यविभागाचे सहाय्यक आयुक्त संजय पाटील व उरणचे परवाना अधिकारी सुरेश बागुलगावे यांना यासंदर्भात वारंवार विचारणा करूनही त्यांनी कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. त्यांनी यावर मौन बाळगणे हेच त्यांच्या सहभागाचे संकेत असल्याचा आरोप सामाजिक स्तरावरून होत आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे मत्स्यविभागातील अधिकाऱ्यांच्या कारभाराबाबत मोठ्या प्रमाणात पान २ वर

## दिल्लीत महिला खासदाराची चेन लंपास

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू असून, दिल्लीत मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर कडेकोट बंदोबस्त असताना सुधा रामकृष्णन या महिला खासदाराची चेन हिसकावून चोरी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. राजधानी दिल्लीत नेते ज्या भागात राहात आहेत, तिथे सुरक्षेची अशी स्थिती असेल, तर सर्वसामान्यांचे काय, असा प्रश्न आता विचारला जात आहे. दिल्लीतील चाणक्यपुरी येथे घडलेल्या या घटनेप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून, अधिक तपास सुरू आहे.

## सुधागडातील दरोडेखोर अजूनही मोकाट

### आठवडा उलटूनही पोलिसांच्या हाती अपयश

| सुधागड–पाली | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील हातोंड, गोंदाव आणि माठळ या गावांमध्ये शनिवारी (दि.२६) रात्री पावणेदोन ते रविवारी (दि.२७) पहाटे सव्वातीन वाजताच्या दरम्यान ४ ते ५ जणांच्या सशस्त्र टोळीने धुमाकूळ घालत घरांवर दरोडे टाकले. मात्र, आठवडा उलटून गेला तरी हे दरोडेखोर अजूनही मोकाटच आहेत. येथील एका फार्म हाऊसच्या सीसीटीव्हीमध्ये ५ संशयित दिसले आहेत. मात्र, अजूनही हे संशयित पोलिसांना सापडलेले नाहीत.



गोंदाव, हातोंड आणि माठळ या गावांमध्ये सशस्त्र दरोडेखोरांनी एकामागून एक घरांना लक्ष्य केले. गोंदाव येथील एका घरात चोरी करून दरोडेखोरांनी हातोंड गाव गाठले. या टोळीने पान २ वर

## पोलीस प्रशासन राजकीय दबावाखाली

### खासदार निलेश लंके यांचा आरोप

| अहिल्यानगर | प्रतिनिधी |

अहिल्यानगर शहरातील पोलीस प्रशासनाच्या कामकाजावर सध्या गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. काही पोलीस अधिकारी राजकीय दबावाखाली काम करत असून, खोटे गुन्हे दाखल करण्याचे सत्र सुरू असल्याचा आरोप राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे खासदार निलेश लंके यांनी केला आहे. तसेच, शहरातील कायदा–सुव्यवस्थेवर गडद सावट पसरले असून, नागरिकांमध्ये पोलीस यंत्रणेवरील विश्वास डळमळीत झाल्याचे दिसून येत आहे, असेदेखील खासदार लंके यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.



शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख किरण काळे यांच्याविरुद्ध काही दिवसांपूर्वी खोट्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. आता या मालिकेत आणखी एक प्रकरण जोडले गेले असून, शिवसेना उपनेते, दिवंगत अनिलभय्या राठोड यांचे पुत्र विक्रम राठोड यांच्यावरही कोणतीही चौकशी न करता थेट ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे प्रकरण अत्यंत संशयास्पद असून, फिर्यादीचा सत्ताधारी पक्षाच्या राजकीय पाठबळ असलेल्या गटाशी संबंध असल्याचे खासदार लंके यांनी म्हटले आहे. या संपूर्ण प्रकरणातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे, सुभाष चौक येथे जाणीवपूर्वक गोंधळ घालणाऱ्या फिर्यादी व्यक्तीविरोधात अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. पोलीस त्यावेळी घटनास्थळी उपस्थित होते. या पार्श्वभूमीवर खासदार निलेश लंके यांनी पोलीस प्रशासनाच्या पक्षपाती आणि निवडक कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत गृह विभागाकडे सखोल चौकशीची मागणी केली आहे. विरोधी पक्षांतील कार्यकर्त्यांविरोधात खोटे गुन्हे नोंदवले जात आहेत, तर प्रत्यक्ष गोंधळ घालणाऱ्यांना अभय दिले जात आहे. ही बाब केवळ अन्यायकारक नसून, पान २ वर

## पोलिसांविरोधात उपोषण सुरु

| अलिबाग | प्रतिनिधी |

पेणमधील कृष्णा सोनावणे याला पेण पोलीस ठाण्यात जातीवाचक शिवीगाळी करून मारहाण करण्यात आली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षकांसह सहाय्यक फौजदाराविरोधात ॲट्रोसिटीचा गुन्हा दाखल करण्याबरोबरच निलंबनाची कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी कृष्णा सोनावणेसह स्वराज्य संविधान रक्षक (पँथर आर्मी)चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुशील जाधव यांनी उपोषण सुरु केले आहे. अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवार दि.४ ऑगस्टपासून उपोषण करण्यात आले आहे. सोनावणे याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, पान २ वर

## पुण्यातील तरुणींचा पोलिसांकडून छळ

### आमदार रोहित पवारांचा आक्रमक पवित्रा

| पुणे | प्रतिनिधी |

पुण्यातील कोथरुड पोलीस ठाण्यात तीन मागासवर्गीय मुलींवर जातीवाचक शेरेबाजी करून त्यांना मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर येत आहे. यामध्ये पीडित तरुणींनी पीएसआय कामठे, कॉन्स्टेबल शिंदे, सायबर पोलीस सानप व आणखी एका पोलीसाने पोलीस ठाण्यात आपला छळ केल्याचा आरोप केला आहे. याबाबत संबंधित पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याची दोन दिवस मागणी करुनही पोलीस त्याची दखल घेत नाहीत, याबाबत काही सामाजिक कार्यकर्त्यांसह संबंधित मुली पुणे पोलीस आयुक्तालयात दिवसभर बसून होत्या. या मुलींना भेटून या संपूर्ण प्रकरणाची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे



आमदार रोहित पवार यांनी घेतली. संबंधित पोलिसांवर गुन्हे दाखल झालेच पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

तरुणींनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस कर्मचारी आणि निवृत्त पोलीस अधिकारी असलेले एका मैत्रिणीचे सासरे कोथरुडमधील त्यांच्या फ्लॅटवर आले. त्यावेळी फ्लॅटमध्ये दोघीजणीच होत्या. त्या पोलिसांनी घरात शिरताच झाडाझडती सुरु केली. त्यांनी दुपारी साडेतीन वाजता तरुणींना कोथरुड पोलीस ठाण्यात नेले. तिकडे त्यांना साडेसात वाजेपर्यंत पोलीस ठाण्याच्या वरच्या मजल्यावर बसवून ठेवण्यात आले. पोलिसांनी त्यांच्या विवाहित पान २ वर

### रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रस्ताव नाकारला | कमी वाहतूक असल्यामुळे प्रकल्प केला रद्द

# अलिबागकरांचे रेल्वेचे स्वप्न भंगले

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे ठिकाण आहे. लाखो पर्यटक अलिबागसह अन्य ठिकाणी फिरण्यास येतात. नोकरी व्यवसायसाठीदेखील अलिबागमध्ये येणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. त्यामुळे अलिबागमध्ये रेल्वे सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती. परंतु, रेल्वेमंत्री यांनी हा प्रस्ताव नाकारला आहे. कमी वाहतूक असल्यामुळे रेल्वे मंत्रालयाने हा प्रकल्प रद्द केला आहे. त्यामुळे अलिबागकरांचे रेल्वेचे स्वप्न भंगले आहे.

रायगड पर्यटन व औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने महत्वाचे ठरत आहे. वर्षाला १० लाखहून अधिक पर्यटक अलिबागसह जिल्ह्यातील अनेक भागात येतात. सिनेस्टार, व्यावसायिक, क्रिकेटर आदी मंडळींकडून अलिबागमध्ये जमीनी विकत घेण्यात आल्या आहेत. अलिबागहून बसने मुंबईला जाण्यासाठी चार तास लागतात. त्यात वाहतूक कोंडी निर्माण झाल्यास कित्येक तास निश्चित स्थळी पोहचता येत नाही. त्यामुळे वाहतूक कोंडीचा फटका पर्यटक, स्थानिक व कामगार वर्गाला कायमच बसत आला आहे. अलिबागसह रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी मोठंमोठे प्रकल्प उभारण्यात आले आहेत.




नव्यानेदेखील प्रकल्प अलिबागमध्ये येऊ घातले आहे. तिसरी मुंबई म्हणून अलिबागकडे पाहिले जात आहे. त्यामुळे नोकरी व्यावसायिसाठी अलिबागमध्ये येणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढली आहे. शहरी भागासह ग्रामीण भागांचा विस्तार वाढू लागला आहे. नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. पावसाळ्यात जलवाहतूक बंद असल्याचा फटका प्रवाशांसह पर्यटकांना बसतो. त्यामुळे अलिबाग रेल्वे सुरु करण्यात यावी, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात आली आहे. रेल्वे व्हावी अशी अलिबागकरांची इच्छा होती; परंतु, रेल्वेचे स्वप्न आता स्वप्नच राहिल्याचे दिसून येत आहे. अलिबागजवळ पेण ते थळ (२६.४१ किमी) पर्यंत राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स (आरसीएफ)चे खासगी रेल्वे साइडिंग अस्तित्वात आहे. अंदाजे कमी वाहतूक असल्यामुळे रेल्वे मंत्रालयाने अलिबाग रेल्वे मार्ग प्रकल्प रद्द केला आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी संसदेच्या अर्थ संकल्पीय अधिवेशनात माहिती दिली की, हा प्रकल्प पुढे नेता येणार नाही, असे सांगितले. रेल्वे प्रकल्पांना मंजुरी देणे ही भारतीय रेल्वेची एक सतत आणि गतिमान प्रक्रिया आहे. रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्पांना मोबदला, पान २ वर

## माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे निधन

| रांची | वृत्तसंस्था |

झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे निधन झाले आहे. प्रदीर्घ काळापासून ते आजारी होते. दिल्लीच्या सर गंगाराम रुग्णालयात वयाच्या ८१ व्या वर्षी शिबू सोरेन यांनी अखेरचा श्वास घेतला. शिबू सोरेन यांची कारकीर्द बरीच वादग्रस्त ठरली. तरीही तीन वेळा त्यांनी मुख्यमंत्रिपद भुषवले होते.



शिबू सोरेन यांनी झारखंडच्या राजकीय इतिहासात आदिवासी समाजाला महत्त्वाचे स्थान मिळवून देण्याचे काम केले होते. १९७५ मध्ये त्यांनी बिगर आदिवासी लोकांसाठीही आंदोलन केले. त्यानंतर १९७७ मध्ये त्यांनी पहिल्यांदा निवडणूक लढवली. मात्र, ही निवडणूक ते हरले. १९८० मध्ये ते लोकसभेत खासदार झाले. यानंतर १९८९, १९९१ आणि १९९६ या वर्षांमध्ये शिबू सोरेन लोकसभा खासदार म्हणून निवडून गेले. २००२ मध्ये त्यांना राज्यसभेवर खासदार म्हणून निवडले गेले. मात्र, त्यानंतर त्यांनी या खासदारकीचा राजीनामा दिला आणि दुमका पान २ वर

# बीईसी केमिकल्समध्ये गॅस गळती

## एक कामगार आयसीयुत

। रोहा । प्रतिनिधी ।

बीईसी केमिकल्समध्ये घडलेल्या गॅस गळतीच्या घटनेने रोह्यातील औद्योगिक सुरक्षेचा फुगा फुटल्याचे चित्र आहे. एकीकडे कंपनी कागदोपत्री सुरक्षा मानके दाखवत राहते, तर दुसरीकडे रात्री ड्युटी करत असलेल्या कामगाराला गॅस गळतीमुळे आयसीयुत जावे लागते, ही दुर्दैवाची आणि संतापजनक बाब आहे.

पंकेश रामचंद्र पाटील (३५, न्हावे, रोहा) हे १ ऑगस्ट रोजी नाईट शिफ्टमध्ये काम करत असताना गॅस गळतीमुळे त्रासाला बळी पडले. मळमळ, दम लागणे, खोकला सुरू झाल्यानंतरही त्यांनी ड्युटी पूर्ण केली. परंतु, नंतर त्यांची प्रकृती अधिकच बिकट होत गेली. सुरुवातीला त्यांना रोहा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर अलिबाग जिल्हा




रुग्णालयात हलविण्यात आले. अलिबागच्या जिल्हा सरकारी रुग्णालयामध्ये पोलिसांनी या घटनेचा पंचनामा केला. त्यावेळी पंकेश पाटील यांनी सांगितले की, पहाटे चार वाजण्याच्या सुमारास पावडरची बॅच घेऊन रेक्टरजवळ घेऊन टाकण्यासाठी जात होतो. त्यावेळी प्लांटमधून येणारा वायू नाका-तोंडात गेला. त्यानंतर खूप त्रास व्हायला लागला. त्यावेळी रमन बलकवडे आणि महेंद्र कदम यांनी माझी विचारपूस केली. मी तशाच अवस्थेत ड्युटी पूर्ण केली आणि घरी गेलो, असे सांगितले.

> **कंपनीमध्ये अशी घटना घडली आहे. ज्या दिवशी घटना घडली त्यादिवशी संबंधित कामगाराने कंपनीला माहिती दिली नाही. तातडीने आम्हाला माहिती दिली असती तर लगेच उपचार सुरू करता आले असते. कंपनी जखमी कामगाराच्या पाठीशी आहे. क्रिटिकेअर रुग्णालयात चांगले उपचार मिळावेत हा हेतू आहे**
> **– गजानन बामणे, वरिष्ठ व्यवस्थापक, एच.आर., बीईसी केमिकल्स**

दरम्यान, ही घटना एखाद्या मशीनच्या चुकीमुळे घडलेली नाही. तर, सतत दुर्लक्षित केल्या जाणाऱ्या सुरक्षा उपाययोजनांचा परिणाम आहे. गॅस गळती ही अपघाती नाही, ती व्यवस्थेतील दुर्लक्षाची सजीव साक्ष आहे, असा आरोप बीईसी केमिकल्समधील कामगार करत आहेत. तसेच, ड्युटीवर असताना त्रास सुरू झाला तरी, कंपनीने वेळेत दखल घेतली नाही. एचआर आले, तेपण फक्त दाखवण्यासाठी. त्यामुळे आमचं आयुष्य 'कॉस्ट कटिंग' मध्ये मोजलं जातंय का? प्रशासन झोपेचं सोंग घेणार का? की मोठी दुर्घटना होईपर्यंत वाट पाहणार? अशी घटना घडूनही औद्योगिक सुरक्षा निरीक्षक, कामगार कल्याण अधिकारी, प्रशासन कोठे आहेत? की सारख्या मोठ्या नावांसशोर कारवाई थांबते? असे संतप्त प्रश्न कामकार विचारत आहेत.

## वर्षावास मालिकेतील चौथे पुष्प



। वेणगाव । प्रतिनिधी ।

भारतीय बौद्ध महासभा, तालुका शाखा कर्जत यांच्या नियोजित वर्षावास मालिकेतील चौथे पुष्प रविवारी (दि.२७) दुपारी २ ते ५ या वेळेत आर्ढे येथे पार पडले. या वर्षावास मालिकेत महाबोधी बुद्ध विहार व बौद्धांची पवित्र स्थळे या विषयावर प्रवचनकार म्हणून अँड. कैलास मोरे यांनी बौद्धांची पवित्र स्थळे या संदर्भात प्रवचन केले. या कार्यक्रमाला रायगड जिल्हा उपाध्यक्ष हरिश्चंद्र यादव, वंचित बहुजन आघाडी, प्रकाश गायकवाड, उल्हास जाधव, सुनील जाधव, हरिभाऊ गायकवाड, संतोष सोनवणे, सचिन सरोते, यशपाल धनवटे, ॲड. हिरामणी गायकवाड, समीर बनसोडे, संदीप धनवटे व गावातील सर्व पदाधिकारी, महिला उपासिका, बालबालकांसह ग्रामस्थ मोठ्यासंख्येने उपस्थित होते.


**अलिबाग नगर परिषद ता.अलिबाग जि. रायगड**
**ई-निविदा सुचना क्रमांक (०८) सन २०२५-२६ (पहिली वेळ)**

अलिबाग नगर परिषद जिल्हा रायगड करीता मुख्याधिकारी अलिबाग नगर परिषद यांचेकडुन बांधकाम विभाग अंतर्गत योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ब-१ नमुन्यातील निविदा पहिल्यांदा ई-निविदा प्रणालीद्वारे मागवित आहेत.

टिपः- वरील निविदेमध्ये (०१) कामे समाविष्ट असुन कामाची संपुर्ण माहीती खालील प्रमाणे संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

https://www.mahatenders.gov.in

दिनांक : ०५/०८/२०२५ स्वा/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद जि. रायगड**


## पान १ वरून

### सांबरकुंड प्रकल्पग्रस्त त्रस्त

शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळावा, अशी मागणी करण्यात आली. त्यानुसार सरकारने दर निश्चित करून मोबदला देण्याचे आदेश दिले. त्यानंतर प्रशासनाच्या हालचाली सुरु झाल्या. अलिबागच्या उपविभागीय अधिकारी यांनी २०२३ मध्ये बैठक घेऊन संभाव्य दराबाबत माहिती दिली. उच्चतम दर घेऊन दर निश्चिती करावी. मोबदला निश्चित करावा, असे कायद्यात असताना न्युनतम दर घेऊन दर निश्चित करण्यात आले. अंतिम निवाड्यानुसार ८२ लाख २८ हजार २४० हेक्टरी संभाव्य दर देण्याचे ठरले. हा न्युनतम दर हा शेतकऱ्यांवर अन्यायकारक आहे. या तुटपुंज्या दराबाबत शेतकरी व प्रकल्पग्रस्त नाराज झाले आहेत. अखेर त्यांनी हेक्टरी २ कोटी रुपयांचा दर मिळावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

### बंदीत चेअरमनची बोट मासेमारीवर

अविश्वास व्यक्त होत आहे. त्यांच्या आर्थिक व्यवहारांपासून ते मिळवलेल्या मालमत्तेची सखोल चौकशी करण्याची मागणी काही सामाजिक संस्थांनी जिल्हाधिकारी व भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाकडे केल्याची माहिती मिळाली आहे. या गंभीर प्रकाराची तात्काळ दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी उरणमधील मच्छिमार समाज व जनतेकडून करण्यात येत आहे.

### सुधागडातील दरोडेखोर अजूनही मोकाट

घरातील लोकांच्या गळ्यावर कोयता ठेवत आणि तलवारीचा धाक दाखवत लूटमार केली. घरातील सोने, रोकड असा मौल्यवान ऐवज लंपास केला. यावेळी सर्व घरांतील मिळून १ लाख रुपयांचे सोने व जवळपास ६० हजार रुपयांची रोकड व मोबाईल लुटून हे दरोडेखोर पसार झाले. यामुळे येथील ग्रामस्थांमध्ये भीती व दहशतीचे वातावरण आहे.

पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे. मात्र, अजूनही पोलिसांना ठोस धागेदोरे हाती लागलेले नाहीत. येथील एका फार्म हाऊसमध्ये लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये पाच संशयित लोक कैद झाले आहेत. त्या अनुषंगाने पोलीस तपास करत आहेत. मात्र, कॅमेऱ्यात कैद झालेले हे लोक नक्की कोणत्या बाजूला गेले हे मात्र पोलिसांना कळलेले नाही. दरम्यान, पालीचे पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी सांगितले की, पोलिसांचा तपास सुरू आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसलेल्या संशयीतांची कोणाला माहिती असेल तर ताबडतोब त्यांनी पोलिसांना कळवावे. सुधागड तालुक्यात व पाली शहरांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्याची संख्या कमी आहे. त्यामुळे दरोडेखोर नक्की कोणत्या बाजूला गेले आहेत हे समजेलेले नाही. आपल्या आजूबाजूला अशाप्रकारे कोणी संशयित निदर्शनास आल्यास ताबडतोब पोलिसांना कळवावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

### पुण्यातील तरुणींचा पोलिसांकडून छळ

मैत्रिणीचा पत्ता विचारुन मारायला सुरुवात केली. सुरुवातीला त्यांनी काही सांगितले नाही. परंतु, जास्त मार बसल्यावर त्यांनी पोलिसांना तिचा पत्ता सांगितला. त्यानंतर पोलिसांनी जातीवाचक शिवीगाळ आणि लैंगिक शेरेबाजी केल्याचे पीडित तरुणीने तक्रारीत म्हटले आहे.

तसेच, त्यांची चौकशी करणाऱ्या महिला कॉन्स्टेबल शिंदे यांनी पीडित तरुणीच्या वैयक्तिक आयुष्याबाबत शेरेबाजी केली. एकट्या राहता, मोकाट सुटलाय. तुम्हाला पाहूनच वाटतं की, तुम्ही एलबीजीटीक्यू कम्युनिटीच्या आहात, असे वारंवार बोलून सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी तिचा शाब्दिक लैंगिक छळ केल्याचे तरुणींनी सांगितले. त्याचबरोबर पोलीस वारंवार जात विचारत होते. त्यांना नाव सांगितले की ते हसायचे. एकाने शिवी दिली की इतरजण हसायचे. पोलिसांनी माझ्या मोबाईलमधील पर्सनल चॅटही वाचले. माझ्या व्हॉईसनोट ऐकल्या. दोन मित्रांसोबतचे चॅट वाचून, या दोघांमधला तुझा बॉयफ्रेंड कोण? असेही पोलिसांनी विचारले. कोथरुड पोलीस ठाण्यात जवळपास चारतास मानसिक आणि शारीरिक छळ करण्यात आला, असा आरोप पीडित तरुणीने केला आहे.

याबाबत सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा आणि अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील यांच्याशी आमदार रोहित पवार यांनी चर्चा केली आहे. रोहित पवार यांनी समाज माध्यमावर पोस्ट करत म्हटले आहे की, सत्तेची मस्ती चढल्याने निर्ढावलेल्या राज्यकर्त्यांच्या दबावात येऊन काम करणाऱ्या सरकारी यंत्रणाही निर्ढावतात. अशा यंत्रणांचा सर्वाधिक फटका हा सर्वसामान्यांना आणि दीनदुबळ्यांना बसतो. तसाच काहीसा प्रकार तीन युवतींच्या बाबतीत घडला आहे. त्यांना चक्क कोथरूड पोलीस ठाण्यामध्ये अत्यंत खालच्या पातळीवर जातीवाचक शिवीगाळ करण्यात आली. याबाबत गुन्हा दाखल व्हावा म्हणून दोन दिवसांपासून सामाजिक कार्यकर्ते आंदोलन करत होते. रविवारी रात्री मी स्वतः तसेच अंजली आंबेडकर, प्रशांत जगताप, सुजात आंबेडकर, अनेक सामाजिक कार्यकर्ते, वंचित, काँग्रेस राष्ट्रवादीचे कार्यकर्ते रात्री ३ वाजेपर्यंत पुणे पोलीस आयुक्तालयात ठाण मांडून बसलो, पण यंत्रणा मात्र तक्रार घ्यायला तयार नव्हत्या. पोलिसांनी तक्रार घेतली नसली तरी जनमताच्या दबावापुढे झुकत पोलिसांकडून तसं लेखी मात्र आम्ही घेतले. पोलीस यंत्रणा सर्वसामान्यांना अशाच प्रकारे त्रास देणार असेल तर आम्हीही आवाज़खाली असाच प्रतिसाद देऊ. झोपलेले गृहमंत्री जागे होतील, ही अपेक्षा! असेही त्यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

**तरुणीच्या शरीराला विकृतपणे स्पर्श**

तरुणीने तक्रारीत म्हटले आहे की, पोलीस ठाण्यातील पुरुष पोलीस सतत माझं शरीर न्याहाळत होते. जणू डोळ्यांनी माझे शरीर स्कॅन करत होते. लेडीज कॉन्स्टेबलही सतत निरीक्षण करत होत्या. काहीतरी प्रश्न विचारत असताना पीएसआय कामठे माझ्या अंगावर आले. त्यांच्या हातांचा, खांद्याचा, हनुवटीचा घाणेरडा आणि विकृत स्पर्श मला झाला, असे तरुणीने तक्रारीत म्हटले आहे. मला साध्या चौकशीसाठी पोलीस ठाण्यात आणले होते. तरीही कॉन्स्टेबल शिंदे यांनी मला गालावर, पाठीवर गुद्दे आणि चापट्या मारल्या. माझ्या कमरेवर आणि पायावर लाथा मारल्या, असेही या तरुणीने तक्रारीत नमूद केले आहे.

### माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे निधन

मतदारसंघातून लोकसभेची पोटनिवडणूक लढवत विजय मिळवला. शिबू सोरेन हे २००५ मध्ये पहिल्यांदा झारखंडचे मुख्यमंत्री झाले. परंतु, अवघ्या दहा दिवसांत त्यांना राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर २००८ आणि २००९ या दोन्ही वर्षी त्यांनी शपथ घेतली; मात्र, मुख्यमंत्रीपदाचा कार्यकाळ ते पूर्ण करु शकले नाहीत.

### पोलीस प्रशासन राजकीय दबावाखाली

लोकशाही मूल्यांवर आघात करणारी आहे, असे निलेश लंके यांनी म्हटले आहे.

नगर शहरात घडणाऱ्या या घटनांमुळे पोलीस यंत्रणेवरील विश्वासार्हता डळमळीत झाली आहे. कायदा-सुव्यवस्था राखण्याच कर्तव्य पोलीस दलावर आहे, त्याच संस्थेवर राजकीय दबावाखाली अन्यायकारक पद्धतीने कारवाई होत असल्याचा आरोप सार्वजनिकरित्या होत आहेत, हे अत्यंत गंभीर आहे. दरम्यान, या दोन्ही प्रकरणांची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, संपूर्ण तपशीलासह अहवाल गृह विभागास सादर करण्यात यावा, खोटे गुन्हे नोंदवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खासदार लंके यांनी केली आहे.

### पोलिसांविरोधात उपोषण सुरु

ते खासगी सुरक्षा रक्षक आहेत. १२ मे २०२५ रोजी पनवेलकडे जाण्यासाठी पेणमधून एसटीत चढत होते. त्यावेळी एका प्रवाशाने धक्का लागल्याचा आरोप करीत शिवीगाळ केली. अखेर हा वाद वाढल्याने पोलीस ठाण्यात चालत निघाले. त्यावेळी रस्त्यातच त्या व्यक्तीने सोनावणे यांना मारहाण केली. अखेर सोनावणे पोलीस ठाण्यात गेले. त्यावेळी सहाय्यक फौजदार ढोबळे यांनी खांद्याला पकडून जबरदस्तीने आतील खोलीत नेले. त्याठिकाणी हाताबुक्क्याने मारहाण केली. जातीवाचक शिवीगाळी देखील केली. ज्या व्यक्तींनी रस्त्यात मारहाण केली त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही. ढोबळे यांनी केलेल्या मारहाणीमुळे गंभीर दुखापत झाली. रक्षकच भक्षक बनल्याने पेणचे पोलीस निरीक्षक संदीप बागूल यांच्याकडे तक्रार केली. परंतु, त्यांनीदेखील योग्य न्याय दिला नाही. त्यामुळे संबंधित पोलीस अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा, त्यांना निलंबीत करावे, या मागणीसाठी उपोष सुरु केले आहे.

**हा आहे, उपोषणकर्त्यांचा आरोप**

रविंद्र ढोबळे यांच्याविरोधात ॲट्रोसिटी गुन्हा नोंदवावा. त्यांना निलंबित करावे. पेण पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक संदीप बागूल यांनासह आरोपी करून गुन्हा दाखल करावा. चुकीच्या पद्धतीने तपास करून फसवणूक केली आहे. पेणचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी ॲट्रोसिटी अंतर्गतचा अर्ज निकाली काढण्यासाठी अडीच महिने लावले. चुकीच्या पध्दतीने रिपोर्ट तयार करून पोलीस अधीक्षक यांची दिशाभूल केली आहे.

**जातीवाचक शिवीगाळी केली नाही. ज्यांनी सोनावणे यांना मारहाण केली होती त्यांचे सीसीटीव्ही फुटेज पाहून त्यांच्याविरोधात कारवाई केली.**
**– रविंद्र ढोबळे, सहाय्यक फौजदार**

### अलिबागकरांचे रेल्वेचे स्वप्न भंगले

शेवटच्या मैलाची कनेक्टिव्हिटी, गहाळ दुवे आणि पर्यायी मार्ग, गर्दीच्या, संतृप्त मार्गांची वाढ, सामाजिक-आर्थिक विचार इत्यादी आधारावर हाती घेतले जातात. जे चालू प्रकल्पांच्या देणग्या, निधीची एकूण उपलब्धता आणि स्पर्धात्मक मागण्यांवर अवलंबून असतात. अलिबाग ते पेण (२८ किमी) नवीन मार्गाच्या बांधकामाचे सर्वेक्षण पूर्ण झाले होते. परंतु, कमी रहदारीच्या अंदाजामुळे प्रकल्प पुढे नेता आला नाही. त्याच मार्गावर कार्यरत राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स (आरसीएफ)च्या रेल्वे साइडिंगचा उल्लेख होता. मंत्रालयाने केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी आरसीएफला या मार्गावर प्रवासी गाड्या चालवण्यासाठी संमती देण्याची विनंती केली होती; परंतु, अद्याप ती मिळालेली नाही. अलिबागजवळ पेण ते थळ (२६.४१ किमी) पर्यंत राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स (आरसीएफ) चे खासगी रेल्वे साइडिंग आहे, जे प्रवाशांच्या वाहतुकीसाठी खुले नाही. रेल्वेने आरसीएफला या मार्गावर प्रवासी गाड्या चालवण्यासाठी संमती देण्याची विनंती केली आहे. २०१९ आणि २०२० मध्ये अशा विनंत्या करण्यात आल्या होत्या. तथापि, आरसीएफने अद्याप संमती दिलेली नाही, असे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले आहेत.

### अल्पवयीन इराणी चोरट्याचा हैदोस

लंपास केले. त्यानंतर पोलिसांनी काही तासांतच आरोपीला अटक केली.

नाशिक येथील गौरव निकम (२६) कामानिमित्ताने ठाण्यात आला होता. त्याने ठाण्याहून नाशिकला जाण्यासाठी तपोवन एक्स्प्रेस पकडली. शहाड आणि आंबिवली स्थानकांदरम्यान एका अज्ञाताने अचानक त्याच्या हातावर फटका मारला आणि त्याचा मोबाईल हिसकावण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात गौरव खाली पडला आणि जबर जखमी झाला. गौरव वेदनेने तडफडत असतानाही १६ वर्षीय आरोपी त्याच्याजवळ आला आणि त्याच्या खिशातून फोन आणि २० हजार रुपये हिसकावून घेतले. गौरवने प्रतिकार केला तेव्हा त्याला जबर मारहाण करण्यात आली. कल्याण रेल्वे पोलिसांना गौरवला उपचारासाठी कल्याणमधील रेल्वे रुग्णालयात दाखल केले. मात्र, परिस्थिती गंभीर असल्याने त्याला एका खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. त्यानंतर कल्याण रेल्वे पोलिसांनी आंबिवलीतील इराणी पाडा येथून अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले. आंबिवली रेल्वे स्थानकाच्या ट्रॅकला लागून असलेला इराणी पाडा हा चोरी आणि साखळी चोरीच्या घटनांसाठी कुप्रसिद्ध आहे. स्थानिक गुन्हेगारांच्या पूर्वीच्या अटकेमुळे अशा गुन्ह्यांना तात्पुरते थांबविण्यात आले होते; परंतु, अलीकडेच घटना पुन्हा सुरू झाल्या आहेत.

### नेरळमधील वयोवृद्धाची आत्महत्या

आत्महत्या केली. त्याबाबत दुपारी काही रहिवाशांना पाण्यात वर तरंगलेला मृतदेह आढळून आला. त्यानंतर नेरळ पोलिसांना कळविण्यात आल्यावर पोलिसांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढला. त्यांच्या खिशात असलेल्या आधार कार्ड आणि चिठ्ठीवरून त्यांची ओळख स्पष्ट झाली. त्या चिठ्ठीत आपण आयुष्याला कंटाळून आत्महत्या करीत असल्याचे लिहिले होते आणि त्यांचा पत्तादेखील लिहून ठेवला होता. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र येथे पाठविला आणि त्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला.

## सर्वांना मिळणार हक्काचे घर

**उपविभागीय अधिकाऱ्यांकडून शासकीय जागेची पाहणी**

। कर्जत । प्रतिनिधी ।

'सर्वांसाठी घरे-२०२२' या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रात व ग्रामीण भागातील शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी शनिवारी उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात बैठक पार पडली. त्याआधी उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी शासकीय जागेवर जाऊन पाहणी करीत संबंधितांना लवकरच घरे नावावर होतील, असा शब्द दिला आहे.

शनिवारी उपविभागीय अधिकारी कार्यालयात कर्जत, खालापूर, खोपोली आणि माथेरान विभागाचे तहसीलदार, मुख्याधिकारी यांच्या उपस्थितीत शासकीय जागेवरील घरे अधिकृत करण्यासंदर्भात बैठक पार पडली. त्यानुसार कर्जत नगरपरिषद येथील भिसेगाव आदिवासी वाडीत उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ हे स्वतः स्थळी जाऊन पाहणी केली. याबाबत अमोघ कुळकर्णी यांनी शासकीय जागेवरील घरे नियमानुकूल




करण्यासाठी शासन दरबारी पत्रव्यवहार केले होते. निवडणुकीदरम्यान तत्कालीन मुख्याधिकारी वैभव गारवे, त्यानंतर मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांनी वाडीमध्ये येऊन पाहणी केली. याप्रसंगी अमोघ कुळकर्णी, ग्राम महसूल अधिकारी पार्वती वामन वाघ, मंडळ अधिकारी शीतल मोरे, मंडळ अधिकारी कडाव संतोष जांभळे, तर नगरपरिषदेचे कार्यालीन अधीक्षक रवींद्र लाड व बापू बहीराम आदी उपस्थित होते.


**पनवेल महानगरपालिका**
**जाहिर निविदा सुचना**

पनवेल महानगरपालिकमार्फत "हर घर तिरंगा" मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी राष्ट्रध्वज खरेदी करणेकामी इच्छूक आयोजक/संस्था यांचे कडून राष्ट्रध्वज प्रती नग दर मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल | दर प्रति नग |
|---|---|---|
| १ | २० इंच X ३० इंच (पॉलिस्टर रोटो पासून बनविलेल्या कापडाचे) | - |

याबाबत विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आली आहे.

जा.क्र.:-पमपा/सा.प्र.वि/२१-२५/प्र.क्र.१०/१७०/२०२५
दि. ०४/०८/२०२५

सही/-
**उपायुक्त (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका.**



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.दत्तात्रेय पांडुरंग राऊत, श्री.शरद पांडुरंग राऊत, सुचित्रा अशोक घरत आणि सुलेखा निशीकांत पाटील यांचेकडून खरेदी घेण्याचा व्यवहार निश्चित केला आहे. वर नमूद व्यक्तींनी मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मापगांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १०८/१ | ००-३७-०० | २.२० |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- ०४/०८/२०२५
**ॲड. रविंद्र वि. ओक**
"गुरूकृपा, अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या मिळकती, सदर मिळकतींचे विद्यमान मालक अजित गंगाधर घाणेकर, हरिष गंगाधर घाणेकर यांचेकडून खरेदी घेण्याचा करार केला आहे. सदर विद्यमान मालकांनी सदर मिळकतींवरील त्यांचा मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे किहिम, ता अलिबाग, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र | आकार रू.पै. |
|---|---|---|
| २८३/१ | ०-४७-०० हे.आर | ९.३१ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकती खरेदी घेणेचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- ०४/०८/२०२५
**ॲड. रविंद्र वि.ओक**
"गुरूकृपा", अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड.



**जाहिर नोटिस**

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे गौरकामत, ता-कर्जत, जि-रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री.अरविंद विठ्ठल हिर्लेकर यांच्या कडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ७१ | २२ | ६६१.७५ | ६७.०० |

सदर मिळकतीच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशिल व जमीन मालकांच्या दरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास, तसेच कोणत्याही वित्तीय बॅक, संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशिल सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि: ०५/०८/२०२५

वकील
**ॲड. सचिन संजय सुर्वे**
पत्ता : नाथ सदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१
मो. नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५७



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकारांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत श्रीमती. नलिनी गजानन देसाई यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे देहरंग, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नं./प्लॉट नं. | क्षेत्रफळ (आर.चौ.मी.) | आकार (रू.पै. |
|---|---|---|
| १/ग/३ | ४३.५०.०० | ४३५.०० |

तरी सदर मिळकतीपैकी कोणत्याही व्यक्तीचा अथवा, संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदी, साठेकरार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्कसंबंध असल्यास, त्याच्या लेखी हरकत आणि त्याच्या हरकत नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत प्रत्यक्ष अथवा, रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहे असे समजून, आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा, विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : कर्जत
दिनांक : ०५/०८/२०२५

**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : गाळा नं.१५, सनराईज अपार्टमेंट,
कचेरी रोड, दत्त मंदिर जवळ,
कर्जत, जि. रायगड ४१०२०१.



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक सौ.सीमा रमेश बोराडे व सौ. पूजा पांडुरंग कडव कडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे-गुढवण, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| सौ. सीमा रमेश बोराडे<br>सौ. पुजा पांडुरंग कडव | ७७ | २ | ०.४०.०० | ०.३० |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तद्‌गभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ०५/०८/२०२५

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८१४९२११३६६/७७०९१६०५६७



**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते खालील वर्णनाची मिळकत तीचे विद्यमान मालक/भोगवटादार यांचेकडून आमचे अशिलांनी श्री.गजानन हनुमंत पाटील आणि श्रीम.शोभना गजानन पाटील यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालिलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजेः कुरकुंडी कोलटेंभी, तालुकाः अलिबाग, जिल्हाः रायगड**

| भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे आर पॉ) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|---|
| वृषाली विवेक सावणेकर | २७५ | २ | ९-५०-०० | ०.२० |

तरी वरिल मिळकती बाबतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, लीएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरिल मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

तारीख : ०४/०८/२०२५

**ॲड. अतुल उल्हास तुरकर**
संपर्काकरीता पत्ता मु.भगवती पो-चौल
ता. अलिबाग, जि, रायगड,
मो.क्र.-९०२१८१२८१९

## निवडक



### गरजूंना किराणा सामान वाटप

**कर्जत :** हिंसासघ संचालित विश्व मैत्री ट्रस्ट व सद्भाव फाऊंडेशन यांच्या सहकार्याने निराधार, विधवा, गरीब, गरजू लोकांना रोजच्या जीवनात लागणारे किराणा सामानाचे वाटप करण्यात आले. कर्जत येथील श्री गणेश मंदिर सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. प्रकल्प अधिकारी सुनंदा लाड यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संजय भाई व जोत्सना बेन यांचे स्वागत प्रगती पाटील यांनी शाल व श्रीफळ, वरमाळा देऊन स्वागत केले. सिद्धार्थ भाई यांच्या वाढदिवसानिमित्त व इंजिनिअरचा पहिला पगार या हेतूने त्यांनी गरिबांना मदत करण्याचे ठरवले आहे. या कार्यक्रमाला सद्भाव फाऊंडेशनचे कार्यकर्ते प्रगती पाटील, पूजा दगडे, संतोष ढाकवळ, केतन लाड, कीर्ती लाड तसेच संतोष बेन, अर्चना बेन, दिलीप भाई, विरम ओसवाल, जायची लाल, राजेंद्र कुमार, हशमूख भाई, सुनील भाई, इंद्र कुमार भाई हे अवर्जुन उपस्थित होते.



### कोंडेपंचतन येथे बांबूलागवडीचा शुभारंभ

**दिघी :** कृषी विभागाच्या पुढाकाराने व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) माध्यमातून श्रीवर्धन तालुक्यातील कोंडेपंचतन येथे बांबू लागवडीचा शुभारंभ करण्यात आला. उपविभागीय कृषी अधिकारी वैभव खटकाळे यांच्या हस्ते सरस्वती गणपत कदम यांच्या शेतात या उपक्रमाचा प्रारंभ झाला. यावेळी तालुका कृषी अधिकारी सुनील जाधव, उपकृषी अधिकारी सयाजी इंगळे, उपकृषी अधिकारी अबोली शेलार, सहाय्यक कृषी अधिकारी पंकज पाटील, कृषीसेवक ए. एस. गावडे , डी.बी. कुंभारकर व अनेक शेतकरी उपस्थित होते. बांबू लागवडीस सध्या चांगली मागणी असून, त्यास दरही समाधानकारक मिळत आहे. त्यामुळे कृषी विभागाच्या वतीने या लागवडीला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले जात आहे. मनरेगा अंतर्गत लागवडपूर्व कामे जसे की जमीन साफसफाई, खड्डे खोदणे, रोपे लावणे, गवत काढणे, कुंपण बांधणे, सिंचन व खत व्यवस्थापन यासाठी अनुदानाचा लाभ मिळणार आहे. ही योजना शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार असून, अधिकाधिक शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. योजनेचा प्रचार व जनजागृतीसाठी विभागाकडून गावोगावी बैठका घेण्यात येत आहेत.

### पंचायत समितीत गोरगरिबांच्या हक्कांवर डल्ला

**उरण :** तालुक्यातील पंचायत समितीमध्ये तत्कालीन गटविकास अधिकारी समीर वठारकर आणि ग्रामविस्तार अधिकारी विनोद मिंडे यांच्याकडे नागरिकांकडून अनेक भ्रष्टाचारविरोधी तक्रारी लेखी स्वरूपात दाखल करण्यात आल्या होत्या. मात्र, या तक्रारींकडे पूर्णतः दुर्लक्ष करून संबंधित अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक भ्रष्टाचाराची पाठराखण केली, असा आरोप उरणकरांकडून करण्यात येत आहे. तक्रारदारांनी थेट संबंधित विभागाच्या मंत्र्यांकडे तक्रारी सादर केल्यानंतर चौकशीचे आदेश देण्यात आले होते. मात्र, चौकशीचा अहवाल कोणत्याही तक्रारदाराला न देता परस्पर अर्ज निकाली काढण्यात आले. हे संपूर्ण प्रकरण पारदर्शक प्रक्रियेविना पार पाडल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर संशय निर्माण झाला आहे. यामध्ये तत्कालीन ग्रामविकास अधिकारी दिलीप तुरे यांच्यावर शासकीय निलंबनाची कारवाई झालेली असतानाही, उरण पंचायत समितीतील काही अधिकारी त्यांना पुन्हा शासकीय सेवेचा लाभ मिळावा म्हणून तक्रारी थांबवण्याचे काम करत असल्याचे स्पष्ट झाले आहे. लवकरच इतर ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवकांनी भ्रष्ट कारभार करून ग्रामपंचायत बदलली असली तरी त्यांचा भ्रष्टाचार उघड होऊन त्यांच्यावरही निलंबनाची टांगती तलवार असणार आहे. विशेष म्हणजे, केंद्र सरकारच्या १५व्या वित्त आयोगांतर्गत आलेल्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा वापर गावच्या विकासासाठी होण्याऐवजी काही ठराविक ठेकेदार, दलाल आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने अपहारासाठी करण्यात येत असल्याचे माहितीच्या अधिकारातून उघड झाले आहे.

# मासेमारीला नारळी पौर्णिमेचा मुहूर्त

## कोळी बांधवांची किनाऱ्यावर लगबग सुरू

- नव्या हंगामासाठी होड्या डागडुजीचे काम जोरात
- जिल्हाभरात सहा सिलिंडरच्या २१३० बोटी

| आगरदांडा | प्रतिनिधी |

दोन महिन्यांच्या बंदीनंतर शुक्रवार १ ऑगस्टपासून जिल्ह्यातील सागरी मत्स्य व्यवसायात मासेमारी हंगामाला पुन्हा सुरुवात झाली असली तरी काही कोळी मच्छिमार बांधव नारळी पौर्णिमेपासूनच मासेमारी हंगामाला सुरुवात करण्यात आहेत. सध्या त्यांची लगबग समुद्रकिनाऱ्यावरील पकटीवर सुरू झाली आहे. नव्या मासेमारी हंगामाकरिता मच्छिमार सज्ज झाला आहे.

रायगड जिल्ह्यात २१३० सहा सिलिंडरच्या बोटी असून, एका बोटीवर १२ खलाशी व नाखवा काम करत असतो, असे एकूण २७ हजार ६९० कामगारांचा या व्यवसायावर उदरनिर्वाह चालत असतो. वर्षभरात करोडोंच्या आसपास उलाढाल होत असते, अशी माहिती महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती उपाध्यक्ष व रायगड जिल्हा मच्छिमार सहकारी सोसायटीचे उपाध्यक्ष तथा मुरुड सागर कन्या मच्छीमार सहकारी सोसायटी चेअरमन मनोहर बैले यांनी दिली.

सागरी क्षेत्रात १ जून ते ३१ जुलै या कालावधीत मासेमारी करण्यास बंदी घालण्यात आली होती. हा काळ माशांचा प्रजनन काळ असतो. त्यामुळे मत्स्य उत्पादन वाढीसाठी हा कालावधी महत्त्वाचा असतो. या काळात मासेमारीसाठी नौकांवर बंदी घालण्यात येते. सरकारने घातलेली मासेमारी बंदी ३१ जुलैला संपली असून, १ ऑगस्टपासून नव्या मासेमारी हंगामाला सुरुवात झाली आहे. मासेमारी बंदी १ ऑगस्ट रोजी उठली असली तरी अद्याप होड्या बंदारावरच आहेत. आजही समुद्रकिनारी कोळी बांधव आपल्या बोटीवरील प्लास्टिक कपडा व बोटीवर रात्रीच्या वेळी चांगला उजेड मिळावा याकरिता सोलर पॅनेल बसविणे, मोठ्या जाळी, बर्फ, पिण्यासाठी पाण्याची टाकी, त्याबरोबर रॉकेल, डिझेल, महिनाभर पुरेल एवढे धान्य, खाद्यपदार्थ व विविध वस्तू बोटीवर भरण्यास सुरुवात केली आहे. नारळी पौर्णिमेचे औचित्य साधून तसेच हवामानातील बदल लक्षात घेऊनच मच्छिमार मासेमारीला सुरुवात करण्याची शक्यता आहे. मासेमारी मोठ्या प्रमाणात होऊन दे, झालेले कर्ज फिटू दे, धंद्यात चांगला फायदा होऊन दे, हीच प्रार्थना समस्त कोळी बांधव सागराकडे करीत असतात.



• (छायाचित्र : गणेश चोडणेकर)







> सर्वसाधारणपणे नारळी पौर्णिमेला सागराला नारळ अर्पण करुन मासेमारी बोटी समुद्रात उतरुन मासेमारीचा हंगाम सुरू होतो. यंदा हवामान चांगले असल्याने या हंगामाला लवकरच सुरू होताना दिसत आहे. अनेकांनी नौकांची डागडुजी, रंगरोगोटी केली आहे. तर, काहींनी आता सुरुवात केली आहे. दोन महिन्यांपासून बसून असलेले मुरुड, एकदराचे कोळी मच्छिमार बांधव पुन्हा नव्या उत्साहात खोल दर्यावर स्वार होण्यासाठी सज्ज झाले आहेत.
>
> – मनोहर बैले, चेअरमन, सागर कन्या मच्छिमार सहकारी सोसायटी

# कुडेकरवरील हल्ल्याप्रकरणी पत्रकार आक्रमक

## प्रेस क्लबच्यावतीने कर्जत पोलीस ठाण्यात निवेदन



| वेनगाव | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील पत्रकार प्रथमेश कुडेकर यांच्यावर अज्ञात व्यक्तींनी प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली असून, या घटनेमुळे पत्रकारिता क्षेत्रात संतापाची लाट उसळली आहे. ही घटना शुक्रवार, दि. १ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास चौक-कर्जत मार्गावरील कर्जत चारफाटा परिसरात घडली.

या घटनेनंतर कर्जत प्रेस क्लब आणि तालुक्यातील पत्रकारांनी संताप व्यक्त केला. या घटनेच्या निषेधार्थ शुक्रवारी कर्जत प्रेस क्लब संघटनेकडून निषेध नोंदवण्यात आला असून, या हल्ल्यातील आरोपींना लवकरात लवकर पकडून कठोर कारवाई करण्यात यावी म्हणून कर्जत पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात हल्ल्यातील आरोपींना लवकरात लवकर अटक करून कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रेस क्लबने प्रशासनाला स्पष्ट शब्दात सांगितले आहे, की सहा दिवसांत सदर आरोपींना शोधून काढा, अन्यथा पोलीस ठाण्यासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

> या प्रकरणात पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून तपासाची गती वाढवली असून, लवकरच आरोपीचा छडा लावला जाईल.
>
> – संदीप भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कर्जत

याप्रसंगी प्रेस क्लबचे गणेश पवार, विजय मांडे, विद्यानंद ओवाल, अनिल गवळे, विलास श्रीखंडे, अजय गायकवाड, मल्हार पवार, ज्ञानेश्वर भागडे, आनंद सकपाल, विपुल माली आदी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी पत्रकारावरील हल्ल्याचा निषेध व्यक्त केला. सुरक्षितेसाठी पत्रकार सुरक्षा कायदा तातडीने लागू करण्याची ठोस मागणी केली आहे.

# मोबाईल चोरीप्रकरणी तिघे अटकेत



| पनवेल | प्रतिनिधी |

शहरातील ओरियन मॉल येथे असलेल्या आयप्लॅनेट स्टोअर नावाच्या मोबाईल दुकानात जवळपास १२ लाख ५० हजार रुपये किमतीच्या मोबाईल चोरीप्रकरणी तीन जणांना पनवेल शहर पोलिसानी ताब्यात घेतले आहे.

या गुन्ह्यातील मुख्य आरोपी अशोक ज्योतिष घराई, रा. ओडिशा याने दुकानातील त्याच्याकडे नऊ आयफोनची विक्री करून त्याच्याकडे जमा असलेली रोख रक्कम ही कंपनीकडे जमा न करता तसेच बनावट पेबॉय लिंकवर खोटे बिल तयार करून काही आयफोन मोबाईल व काही रोख रकमेचा अपहार करून कंपनीची फसवणूक करून तो ओडिशा येथे पसार झाला होता. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, पोहवा सूर्यकांत कुडावकर, प्रवीण मेथी, रवींद्र पारधी, पोलीस शिपाई शशिकांत काकडे, साईनाथ मोकल आदींच्या पथकाने मुख्य आरोपी अशोक ज्योतिष घराई हा ओडिशा येथील एका गावात लपल्याची माहिती मिळाली. त्यानुसार स्थानिक पोलिसांच्या मदतीने तेथील नदी पार करून त्याला ताब्यात घेतले असता त्याने दिलेल्या माहितीनुसार त्याला चोरीस मदत करणारा रजत सिंग व चोरीचे मोबाईल विकत घेणारा विशाल दोषी, रा. ताडदेव मुंबई यांना अटक करण्यात आली आहे.

# फुलचंद पानात गांजाची झिंग?

## प्रशासनाच्या नाकाखाली नशेचा बाजार

| उरण | प्रतिनिधी |

उरण शहर आणि तालुक्यात फुलचंद नावाच्या पानाची क्रेझ वाढली असून, या पानांमुळे तरुण पिढी गांजासारख्या नशेच्या आहारी जात असल्याचा संशय आहे. गावोगावच्या पानटपऱ्यांवर खुलेआम विक्री होत असून, यामध्ये अंमली पदार्थांची भेसळ असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे.

फुलचंद, पंचरत्न, नवरत्न, १२०-३००, बनारस आणि कलकत्ता या नावांनी नशायुक्त पान विकले जात असून, एक पान ३० ते ३५ रुपयांना विकले जाते. यातून मिळणारी झिंग गांजासारखी असून, अल्पवयीन विद्यार्थीही याच्या आहारी जात आहेत. काही ठिकाणी या पानांवर मैफिली आणि पैजादेखील लावल्या जात आहेत.

शहरातील, जेएनपीटी, द्रोणागिरी, कंटेनर यार्ड व ढाब्यांवर ही पानं सर्रासपणे मिळत असून, सुगंधित तंबाखू, सुपारीसह अज्ञात नशेचा पदार्थ त्यात मिसळला जातो. परिणामी, अनेक तरुणांचे आरोग्य धोक्यात येत आहे. कर्करोग व इतर गंभीर आजारांचा धोका निर्माण झाला आहे. यावर कारवाई करण्याऐवजी अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस विभाग बघ्याची भूमिका घेत आहेत, असा आरोप आहे. गुटखा, सिगारेटसारख्या पदार्थांवर बंदी असताना, गांजासदृश्य नशा देणाऱ्या पानांची विक्री रोखण्यात प्रशासन अपयशी ठरत आहे. तरुण पिढीचे भवितव्य प्रशासनाच्या दुर्लक्षित कारभारामुळे धोक्यात आले आहे.

# आबदत मुन्शी, तजिन काजींना निरोप

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल एज्युकेशन सोसायटी संचालित याकूब बेग हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेजचे सहाय्यक शिक्षक आबिद मुन्शी आणि तजिन काजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या निवृत्तीनिमित्त याकूब वेग हायस्कूल कॅम्पसमध्ये निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इकबाल हुसेन काझी अध्यक्षस्थानी होते. याकूब बेग हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य असीम पटेल यांनी सोसायटीचे अध्यक्ष आणि पदाधिकारी आणि निवृत्त शिक्षकांच्या नातेवाईकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.




## पनवेल बाजारपेठेत हटके राख्यांची रेलचेल | राख्यांचे नवे ट्रेंड ग्राहकांच्या पसंतीस

# रेशमीबंधाला ज्वेलरीचा स्टायलिश लूक



राजेश डांगळे
| पनवेल |

रक्षाबंधन काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे पनवेल शहरात सणाचे वारे जोरात वाहू लागले असून, प्रत्येक दुकानामध्ये राखी खरेदीसाठी ग्राहकांनी गर्दी केल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. २५ रुपयांच्या साध्या राखीपासून ते दोन हजारांपर्यंतचे पर्याय उपलब्ध आहेत. ऑनलाइन खरेदीचा पर्यायही खुला आहे. यंदाच्या राखी विक्रीत परंपरेला स्पर्श करत, 'ट्रेंडी राख्या' ग्राहकांच्या पसंतीस उतरल्या आहेत.

गेल्या काही वर्षांपासून राखीच्या स्वरूपात मोठे बदल पाहायला मिळाले असून, यंदा बाजारात खास करुन फॅशन राखी, ज्वेलरी टच राखी आणि थीम बेस्ड राख्यांनी धुमाकूळ घातला आहे. कार्टून, सुपरहिरो, मेटॅलिक लूक, पर्ल आणि रुद्राक्ष अशा स्टाइलिश राख्यांचे खास आकर्षण आहे.

लहान मुलांना कार्टूनचे चित्र असलेल्या राख्यांसह ब्रेसलेट, पर्ल, चंदन, डिझायनर, जरदोसी, सीड्रोड, डायमंड, खुभराखी, रुद्राक्ष, चंदन व मौल्यवान खडे असलेल्या राख्यांचीही विक्री केली जात आहे. पूर्वी मोठ्या राख्यांना ग्राहकांची पसंती होती. परंतु, आता आकाराने लहान व स्टायलिश राख्यांना पसंती मिळत आहे. सध्या राख्यांचा सरासरी भाव साधी राखी २५ ते १००, कुंदन वर्क ३० ते १६०, भोती राख्या २० ते ८०, कपल राखी ३० ते १२०, सोने-चांदी राखी ५०० ते २ हजार, लुबा राशी ५०० ते २००० असे असून, ऑनलाईन खरेदीमध्ये २५ रुपयांपासून ते १०० रुपयांपासून दोन हजार व त्याहीपेक्षा जास्त किमतीच्या राख्या उपलब्ध होत आहेत.

**बाजारातील किमती**
ब्रेसलेट/फॅशन राख्या : ५० ते १५०
चंदन/रुद्राक्ष : ७० ते २५०
कपल राखी सेट : १०० ते ३००
सोन्याची झाक असलेली राखी : ५०० ते २०००
ऑनलाइन खास पॅकिंगसह राखी गिफ्ट बॉक्स : १५० रुपयांपासून पुढे

**नवीन काय?**
पारंपरिक राख्यांपेक्षा हलक्या व आकर्षक ब्रेसलेट राख्यांना मागणी आहे. जोडप्यांसाठी 'कपल राखी', पर्यावरणपूरक कापडी राख्यांना पसंती असून, गिफ्ट बॉक्समध्ये मिठाई, छोटं ग्रीटिंग आणि राखीचा संगम पाहावयास मिळत आहे. पूर्वी राखी फक्त भाऊ-बहिणीचा सण मानला जायचा. आता ती एक फॅशनेबल गिफ्ट होऊ लागली आहे, असं एका कॉलेज तरुणीचं मत आहे.

# कोणाच्या बापाचे काय जाते?

शिंदे शिवसेनेच्या आमदार व मंत्र्यांनी उन्मत्तपणाचे नवनवे नमुने पेश करण्याचा चंग बांधलेला दिसतो. समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट यांनी अकोल्यात आणखी एक बेपर्वा आणि उर्मट वक्तव्य केले आहे. एका सभेतला हा व्हिडिओ काल सर्व मराठी जनतेने वृत्तवाहिन्यांवरून पाहिला. त्यात समोर बसलेल्या श्रोत्यांना शिरसाट म्हणत आहेत की, माझ्याकडे तुम्ही कितीही पैसे मागा, पाच कोटी, दहा कोटी, नाही दिला तर नावाचा संजय शिरसाट नाही. शेवटी पैसा आपल्या बापाचा थोडाच आहे. सरकारचा आहे. शेवटी सरकारचा पैसा कसा वापरायचा हे कळायला पाहिजे. सरकार आणि सरकारचा पैसा यांच्याकडे यातले मंत्री कशा रीतीने पाहतात याचा हा उत्तम नमुना आहे. शिंदे यांची सेना आणि तमाम महाराष्ट्र शिवाजीमहाराजांचे नाव घेतो. महाराजांनी आपल्या मावळे सैनिकांना लिहिलेली पत्रे प्रसिध्द आहेत. शेतकऱ्यांच्या शेतातल्या धान्याच्या एका कणसाला देखील धक्का लावता कामा नये असा सक्त आदेश ते देतात. दुसरीकडे धान्याच्या कोठारांमध्ये उंदरांमुळे आगी लागतील असा बारकाईने विचार व त्याबद्दलचा इशाराही त्यांनी दिला होता. चोवीस तास प्रजेच्या हिताचा विचार करणारा हा राजा आणि त्याच्या नावाने मते मागणारे, दादागिरी करणारे आणि सत्तेचा माज दाखवणारे हे आजचे आपले नेते. सरकारचा पैसा आपल्या बापाचा किंवा आपला नाही, त्यामुळे तो कसाही व कुठेही ओरबाडला तरी काय फरक पडतो असा शिरसाट यांच्या म्हणण्याचा सूर आहे. शिवाय, सरकारकडून पैसा काढून घ्यायला आपल्यासारखी अक्कल व त्यासाठी आपल्यासारखी सत्ता लागते असा उद्दामपणाचा सूरही त्यात आहे. याच शिरसाट यांच्या मुलाने संभाजीनगरातले एक आलिशान हॉटेल विकत घेण्यासाठी त्याच्या उत्पन्नाच्या पलिकडच्या अशा अचाट रकमेची जमवाजमव केली होती. त्याविषयी ओरडा झाल्यावर मग तो सौदा रद्द करण्यात आला. पण शिरसाट यांच्याबाबतचे वाद चालूच राहिले. हेच शिरसाट नोटांची बंडले भरलेल्या बॅगा शेजारी ठेवून आपल्या बेडरुममध्ये सिगारेट ओढत बसले आहेत असा व्हिडियो काही दिवसांपूर्वी सर्वत्र व्हायरल झाला होता.

## शिंद्यांपुढे झुकणारे फडणवीस

त्याच काळात शिरसाट यांना प्राप्तिकर खात्याची नोटीस आली होती. त्यावर त्यांनी एकनाथ शिंदेंचे पुत्र श्रीकांत शिंदे यांनाही नोटीस आल्याचे सांगून त्यांना त्यात गुंतवण्याचा प्रयत्न केला. नंतर वादविवाद झाल्यावर त्यांनी माघार घेतली व आपल्याला नोटीस आली हे मान्य केले. शिरसाट यांच्या गेल्या काही वर्षात प्रचंड वाढत गेलेल्या संपत्तीबाबत संभाजीनगरमध्ये बोलले जाते. आतादेखील समाजकल्याण खाते मिळाल्यामुळे ते नाराज होते. लाडकी बहीण योजनेसाठी आपल्या खात्याचा निधी वळवल्याबद्दल त्यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली होती. त्यावरूनच नंतर देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना अप्रत्यक्ष झापले होते. एकूण शिरसाट हे बरेच उद्योगी मंत्री आहेत हे यावरून लक्षात येते. असे मंत्री व नेते सरकारकडचा पैसा आपल्याला हव्या त्या दिशेने वळवण्यात प्रवीण असतात असा आजवरचा अनुभव आहे. अनेकदा त्यांनाच कार्यक्षम मंत्री असेही म्हटले जाते. पण सरकारी पैशांबाबत त्यांचा खरा दृष्टिकोन काय असतो हे शिरसाटांच्या उद्गारांवरून लक्षात यावे. अर्थात, शिरसाट यांनी हे जाहीरपणे बोलून दाखवले. बाकीचे न बोलूनही हेच मानत व करत असतात. सरकारच्या पैशांवर डल्ला मारणे ते दरोडा टाकणे असे प्रकार चालू असतात. लाडकी बहीण योजना हा तर सर्वांच्या डोळ्यादेखत, खुल्लम खुल्ला जनतेच्या तिजोरीवर टाकलेला दरोडा आहे. शिवाय याच आधारे मते मागून हे सरकार सत्तेत आले आहे. यामध्ये लाखो अर्जदार बेकायदा असूनही त्याबाबत फडणवीसांनी कोणतीही माफी मागितलेली नाही वा कारवाईही केलेली नाही. कहर म्हणजे खुद्द शिरसाट यांच्या वक्तव्याविषयी फडणवीस यांना काल जेव्हा विचारले तेव्हा मंत्री विनोदाने काहीतरी बोलतात, प्रत्येक वेळी अशी वक्तव्ये गांभीर्याने घ्यायची नसतात असे सांगितले. हा आपल्या बापाचा पैसा थोडाच आहे असे एखाद्या मंत्र्याने म्हणावे आणि फडणवीसांना त्यात काहीच गैर वाटू नये हे चीड आणणारे आहे. याचा अर्थ एक तर फडणवीस हेही असंवेदनशील झाले आहेत किंवा ते कोणत्या तरी मजबुरीमुळे शिंदे गटाची पाठराखण करीत आहेत.

## जनता बिनबापाची लेकरे

शिंदे गटातील आमदारांची बरीच प्रकरणे अलिकडे बाहेर आली. रामदास कदम यांचे चिरंजीव योगेश कदम यांच्या कांदिवलीमधील डान्सबारमध्ये तर सरकारी अधिकाऱ्यांनीच धाड घातली व बारबालांना ताब्यात घेतले. तरीही योगेश कदम यांनी काहीही वावगे केलेले नाही असे सर्टिफिकेट एकनाथ शिंदे यांनी देऊन टाकले. देवेंद्र फडणवीस यांना कारवाई करण्याची काही शक्यताच ठेवली नाही. शिवाय शिंदे लगोलग दिल्लीत गेले व त्यांनी भाजप श्रेष्ठींशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. तो झाला की नाही हे कळू शकले नसले तरी आपल्या या दिल्लीच्या कनेक्शनचा देवेंद्रांवर दबाव टाकण्याचा त्यांचा प्रयत्न स्पष्ट आहे. मुद्दा असा की, हे सरकार देवेंद्र चालवत असले तरी तीन गटांचे मंत्री व नेते स्वतःला त्या सरकारचे बाप मानत आहेत. वाटेल तसे वागत आहेत. त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यात देवेंद्रांना अपयश आले आहे. त्यांना निवडून दिलेल्या सार्वभौम जनतेचा हा खुलेआम चालू असलेला अपमान आहे. कालच आरोग्यराज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी एका सभेमध्ये ग्रामसेवकांच्या कानाखाली आवाज काढण्याचा इशारा दिला. हे ग्रामसेवक जनतेची कामे करीत नसल्याबद्दल आपण असे बोललो व पुन्हादेखील बोलू अशी गुर्मीची भाषा मेघनाबाईंनी नंतर केली. या ताईंना विधानसभेत प्रश्नांची धड उत्तरे देता येत नाहीत. पण बाहेर यांचा तोरा असा आहे. ग्रामसेवक व सरकारी अधिकारी नालायक व भ्रष्ट असतात हे जनतेलाही ठाऊक आहेच. मात्र मंत्री व नेते त्याहूनही अधिक भ्रष्ट तसेच कामे न करणारे असतात असा जनतेचा आजवरचा अनुभव आहे. मेघनाबाईंच्याच खात्याचा विचार करायचा तर सरकारी रुग्णालयांची दारुण अवस्था, अनेक रिक्त पदे, औषध खरेदीतील घोटाळे असे अनेक मुद्दे आहेत. याबद्दल जनतेने कोणाकोणाच्या कानाखाली वाजवावी असा प्रश्न आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात उद्धव ठाकरे यांचे सरकारवर नियंत्रण नाही, शरद पवारच बाहेरून सरकार चालवतात, अजितदादा इतर पक्षांना जुमानत नाहीत असे आरोप विरोधी पक्षनेते म्हणून देवेंद्र फडणवीस करीत होते. आता त्यांच्याकडे राक्षसी बहुमत असूनही त्यांच्या राजवटीत जनतेची अवस्था बिनबापांच्या लेकरांसारखी झाली आहे. मध्यंतरी वादग्रस्त मंत्री माणिकराव कोकाटे, योगेश कदम इत्यादींना पदावरून काढणार अशी जोरदार चर्चा होती. पण अखेर देवेंद्रांनी त्यांना नुसताच दम देऊन सोडून दिले. कोकाटे यांचे खाते बदलण्यात आले. पण एकूणच आपल्या बापाचे काय जातेय असाच यातला दृष्टिकोन आहे.

विचार

# हमाम मे सब नंगे!

***महिलांच्या सौंदर्याचा वापर करून हवे ते पदरात पाडून घेण्यावर राजकारणात भर दिला जात असल्याचे अलिकडे नव्याने अधोरेखीत झाले. ही पद्धत जुनी असली, तरी आता त्याचे लोण गावपातळीपर्यंत पोहोचले आहे. नियमानुसार न करता येणारी कामे 'हनी ट्रॅप'चा वापर करुन केली जात आहेत. विषकन्यांचा विळखा आता राजकारणी, अधिकारी आणि अन्य घटकांभोवती आवळला गेला आहे.***



गेल्या अनेक वर्षांमध्ये सुंदर महिलांचा वापर करून शत्रूराष्ट्रातील संरक्षण सिद्धतेची गोपनीय माहिती मिळवली जात आहे. फक्त पैसे कमवण्यासाठी महिला आपल्या शरीराचा उपयोग करू देतात, तेव्हा त्याला 'लेदर करन्सी' असे नाव असते; परंतु त्यापुढे जाऊन पैशापेक्षाही महिलांच्या सौंदर्याची भुरळ घालून कामे करून घेतली जातात, तेव्हा त्यात जास्त धोका असतो. महिलांसोबतच्या नाजूक प्रसंगाची छायाचित्रे, व्हिडीओ वापरून त्या माध्यमातून सातत्याने 'ब्लॅकमेलिंग' केले जाते. त्यातून पैसे मिळतातच; शिवाय अनेक बेकायदेशीर कामे करून घेतली जात असतात. अलिकडच्या काळात फोटोंचे मॉर्फिंग करून 'ब्लॅकमेल' करण्याचेही प्रकार वाढले आहेत. त्यात तहसीलदार, उपनिबंधक, वरिष्ठ महसूल अधिकारी, पोलिस अधिकारी, बांधकाम खात्याचे अधिकारी अशा सर्वांचाच सहभाग असतो. अर्थात काही अधिकारी त्याला अपवाद आहेत. नाही असे नाही; परंतु मोहाच्या क्षणी मनावर नियंत्रण राखू न शकणारे अधिकारी 'लेदर करन्सी'बरोबरच 'ब्लॅकमेलिंग'चे ही बळी ठरतात. काहींनी तर आता नियमात न बसणारी कामे करून घेण्यासाठी सुंदर महिलांचा वापर करून घेण्याचा एक नवाच उद्योग सुरू केला आहे. शेकडो कोटी रुपयांच्या कामांचे कंत्राट मिळवण्यासाठी 'हनी ट्रॅप'चा उपयोग करून घेतला जात आहे. गेल्या काही वर्षांमध्ये सुंदर महिलांचा वापर करून अधिकारी, मंत्र्यांना वश करून हवे ते मिळवण्याचा प्रयत्न करण्याचे प्रकार घडले आहेत. त्यातून काही खुनाचे प्रकारही घडले आहेत.

राजकारणीच नव्हे तर, काही माध्यमे आणि माध्यमकर्मींनीही राजकीय नेत्यांना 'हनी ट्रॅप'मध्ये अडकवण्यासाठी महिलांचा वापर करून खिसे गरम करण्याचेही प्रकार घडले आहेत. एखाद्या वादविषयावर वृत्तमालिका लिहायच्या, त्यात राजकारण्यांची थेट नावे न देता नावाची केवळ ओळख जनतेला होईल, अशा प्रकारची वृत्ते द्यायची आणि पैसे कमवायचे, असा प्रकार आजही सुरू असतो. पैसे मिळेपर्यंत मालिका सुरू ठेवायच्या आणि पैसे मिळाल्यानंतर बंद करायच्या, अशी पद्धत असते. त्यासाठी माध्यमातील काही विकृत व्यक्ती महिलांना ठराविक रक्कम देतात. नंतर त्यांच्याकडून राजकारण्यांना 'हनी ट्रॅप'चे बळी बनवले जात असते. काही जिल्ह्यांमध्ये तर राजकारण्यांना महिला पुरवून त्यांच्याकडून हवी ती कामे करून घेणाऱ्या टोळ्या तयार झाल्या आहेत. त्यात सर्वपक्षीय राजकारण्यांचा सहभाग असतो. 'हमाम मे सब नंगे' अशी स्थिती असते. नाशिकमध्ये पुढे आलेला 'हनी ट्रॅप'चा ताजा प्रकार हे केवळ हिमनगाचे टोक आहे.

**भागा वरखडे**

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर चर्चेत असलेल्या 'हनी ट्रॅप' प्रकरणाचा गोपनीय तपास पुन्हा सुरू करण्यात आला आहे. राज्यातील तब्बल ७२ सनदी अधिकारी, राजकीय नेते तसेच आजी आणि माजी मंत्रीदेखील या जाळ्यामध्ये अडकल्याची तक्रार आहे. पोलिस उपनिरीक्षक, सहायक आयुक्त, पोलिस उपायुक्त, पोलिस उपनिरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक, सहायक पोलिस आयुक्त अशा मोठ्या दर्जाच्या अधिकाऱ्यांना 'हनी ट्रॅप'मध्ये अडकवून खंडणी मागणाऱ्या महिलेची गोपनीय पद्धतीने चौकशी सुरू झाली आहे. त्यामुळे या प्रकरणामुळे फक्त नाशिकच नाही, तर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. नाशिकमधील एका अधिकाऱ्याला ठाण्यातील एका राजकीय पक्षाशी संबंधित असलेल्या महिलेच्या मदतीने नाशिकमधील एका राजकीय कनेक्शन असलेल्या हॉटेल व्यावसायिकाने या प्रकरणात अडकवल्याचे सांगितले जाते. या प्रकरणात 'मास्टर माईंड' कोण, याचा शोध घेतला जात आहे. राज्यातील अनेक वरिष्ठ सरकारी अधिकारी आणि आजी-माजी मंत्री 'हनी ट्रॅप'च्या जाळ्यात अडकल्याची माहिती समोर आल्यानंतर या षडयंत्राचा 'मास्टरमाईंड' हा नाशिकचाच असल्याचे समोर येत आहे. तो एका मोठ्या राजकीय पक्षाचा माजी पदाधिकारी आहे. हा प्रकार ज्या हॉटेलमध्ये घडला, त्या हॉटेलमधील कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांचे जबाब नोंदवले जाणार आहेत. यातून प्रकरणातील अनेक धागेदोरे उलगडण्याची शक्यता आहे.

या प्रकरणाची वाच्यता होताच, राज्यातील अनेक अधिकाऱ्यांच्या नावाची चर्चा सुरु झाली आहेत. यात महसूल विभागातील सर्वाधिक अधिकारी गुंतल्याची माहिती आहे. त्यांनी महिलांच्या माध्यमातून अधिकाऱ्यांकडून पैसे उकळण्याचे किंवा हवे ते काम करून घेतले असण्याची शक्यता आहे. नाशिकमधील मुंबई नाका पोलिस ठाण्यात एका महिलेने आपले लैंगिक शोषण झाले असून आपल्याकडे संवेदनशील व्हिडीओ असल्याची तक्रार दाखल केल्यापासून 'व्हीआयपी हनीट्रॅप' चर्चेत आला. आता या प्रकरणात राजकारण सुरू झाले आहे. विधानसभेत आणि विधान परिषदेत त्यावर चर्चा झाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी कोणाचीही तक्रार नसल्याचे सांगितले असले आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी खुशाल तिकीट लावून सीडी लावा असे आव्हान दिले असले, तरी काही आजी- माजी मंत्री, अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. जगातील अनेक देशांमध्ये सुंदर महिलांचा वापर शत्रूराष्ट्रातील लष्करी हालचाली तसेच त्या देशातील अन्य गोपनीय माहिती मिळवण्यासाठी केला जात असल्याची वारंवार चर्चा होत राहते. त्याच्या सूरस कहाण्याही ऐकवल्या जातात. आपल्याकडेही अलिकडेच संरक्षण आणि संशोधन संस्थेतील अधिकाऱ्यांना वश करण्यासाठी महिलांचा वापर करण्यात आल्याचे दिसून आले. रशियातील एका महिलेने, तर पन्नास वर्षांपूर्वी हनी ट्रॅप केले होते. भारतात लष्करी जवान, संरक्षण आणि संशोधन क्षेत्रातील अधिकाऱ्यांना वश करून त्यांच्याकडून गोपनीय माहिती मिळवण्याचे अनेक प्रकार घडले आहेत.

देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हे घातक आहे. या व्यापक हनी ट्रॅप मोहिमेत नोकरशहा आणि राजकारण्यांसह इतक्या मोठ्या संख्येने 'हाय-प्रोफाइल' व्यक्तींना कसे लक्ष्य केले गेले, गुप्तचर संस्थांना वेळेत शोधण्यात किंवा हस्तक्षेप करण्यात अपयश का आले आणि भविष्यात अशा गुन्ह्यांचा नाश करण्यासाठी कोणते उपाय राबवले जात आहेत या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. असेच काही महाराष्ट्राच्या राजकारणात घडत असल्याचा आरोप आहे. 'हनी ट्रॅप' करणारे लोक डिजिटल आणि वैयक्तिक संवादांद्वारे विश्वास मिळवतात आणि नंतर बलात्काराचे खोटे आरोप लावण्याची धमकी देऊन 'ब्लॅकमेल' करण्यासाठी गुप्तपणे आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडीओ रेकॉर्डिंग करतात. हे संघटित गुन्हा करण्यासारखे आहे. या प्रकरणाच्या तपासात जनतेला पारदर्शकता हवी आहे.

सध्या महाराष्ट्रात वादळापूर्वीची शांतता आहे. काही संशयास्पद व्हिडीओंची शांतपणे चौकशी केली जात आहे. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर अनेक अधिकारी आणि नेत्यांचे भविष्य उद्ध्वस्त होईल, असा अंदाज वर्तवला जात आहे. हे एक सुनियोजित 'हनी ट्रॅप ऑपरेशन' होते की केवळ प्रभावशाली लोकांची रासलीला होती हे स्पष्ट झालेले नाही. हा व्हिडीओ इतका संवेदनशील असल्याचे म्हटले जाते की कोणताही अधिकारी या प्रकरणात पुढे येण्याचे धाडस करू शकत नाही.

नाशिकमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह मुंबई आणि पुण्यातील अनेक वरिष्ठ अधिकारी या सापळ्यात अडकू शकतात. आतापर्यंत कोणीही अधिकृत पातळीवर कोणतेही मोठे विधान केलेले नसले, तरी ज्या पद्धतीने हे प्रकरण गुप्त ठेवले जात आहे, त्यामुळे संशय निर्माण होत आहे. ना पीडित उघडपणे पुढे येत आहे ना आरोपी. अशा परिस्थितीत, हा घोटाळा हळूहळू राजकीय स्फोटाचे रूप घेऊ शकतो. पाच वर्षांपूर्वी महाराष्ट्रात काही माध्यमांनी 'हनी ट्रॅप'च्या मालिका चालवून राजकीय नेत्यांना कसे 'ब्लॅकमेल' केले, याच्या सुरस कथा सांगितल्या गेल्या होत्या. राजकीय नेत्यांच्या नावाचे संकेत देत वृत्तमालिका चालवल्या गेल्या. नंतर त्यातून एक खून प्रकरण घडले. त्या वेळीही एका पोलिस अधिकाऱ्याला 'हनी ट्रॅप'मध्ये कसे अडकवले होते, हे ही पुढे आले होते. रेखा जरे खून प्रकरण आणि त्यातला काहींचा सहभाग आणि त्यांचे 'हनी ट्रॅप'शी असलेले अप्रत्यक्ष संबंध हा ही राज्यात चर्चेचा विषय झाला होता. आता ताजे प्रकरण अशा कोणत्याही घातक वळणावर जायचे नसेल तर पोलिस यंत्रणेने आणि गृह विभागाने वेळीच जागे होण्याची गरज आहे.

चर्चा आजची

# आधी स्थानिकांना खतांचा पुरवठा करा!






स्थानिक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्यामुळेच थळ येथे १९८० साली आरसीएफचा खतनिर्मिती प्रकल्प उभारण्यात आला आहे. मात्र, याची जाण आज आरसीएफ कंपनीला नसल्याचे चित्र आज दिसून येत आहे. रायगड जिल्ह्यात आरसीएफचा खतनिर्मितीचा कारखाना आहे. परंतु, याच जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खतांची गरज असताना, ती वेळेवर न मिळणे, यापेक्षा दुर्भाग्य कोणते?

रायगड जिल्ह्यात आधीच मान्सूच्या लहरी पावसाने शेतकऱ्यांपुढे खेळ मांडला आहे. परिणामी, भातशेतीचे लागवडीखालील क्षेत्र घटले आहे. कारण, पेरणी करण्यास वेळ पावसाने दिला नाही. वेळेआधीच कोसळलेल्या पावसाने पूर्णतः जमिनीची ऊब घालवली. त्यामुळे पेरलेले भात वाया गेले. त्यामुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली. तेसुद्धा भात रुजून आले नाही. शेवटी शेतकऱ्याला तिसऱ्यांदा भाताचा रो करुन पेरणी करावी लागली. जिद्द, मेहनत आणि चिकाटीतून शेतकरी नेहमीच काळ्या मातीतून पिवळं सोनं पिकविण्यासाठी तयार असतो. परंतु, त्याला अस्मानी संकटांची झोड नेहमीच सहन करावी लागत आहे. त्याचाही सामना करत कितीही कष्ट करण्यासाठी तयार असतो. परंतु, त्याला शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी वेळेवर मिळण्याची आशा असते. परंतु, अनेकदा 'त्या' वेळेवर मिळत नसल्याने आज शेती करणे कठीण होऊन बसले आहे.

आज उरण तालुक्यातील शेतकऱ्यांना खते मिळविण्यासाठी धावाधाव करावी लागत आहे. खतांचा तुटवडा असल्याने अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे शेतकऱ्यांकडूनच सांगितले जात आहे. खरीप हंगामातील पिकांना सध्या खतांची आवश्यकता असताना, ऐन हंगामातच शेतकऱ्यांना खते मिळत नसल्याने खत निर्मिती करणाऱ्या आरसीएफ कंपनीविरोधात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. भात रोपांची उत्तम वाढ व्हावी यासाठी शेतकरी खतांचा वापर करतात. भातलावणीनंतर आठ दिवसांनी पहिला हप्ता आणि पंधरा ते महिनाभरात दुसरा हप्ता देत पिकांची वाढ योग्य प्रकारे कशी होईल याची काळजी घेत असतात. परंतु, वेळेवर खत मिळत नसल्याने लावलेल्या भातांच्या रोपांची वाढ खुंटण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपली शेती चांगली बहरावी, फुलावी, चांगले उत्पादन मिळून खर्च वजा जाता, चार पैसे गाठी राहावेत,

**राकेश लोहार**

यासाठी शेतकरी शेती लावणीपासून कापणीपर्यंत उत्तम प्रकारे नियोजन करुन भातपीक घेत असतो. परंतु, मध्येच अडथळे आल्यास त्याचे गणित कोलमडून जाते. आज खतांच्या तुटवड्यामुळे मोठी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. आज उरण तालुक्यातील शेतकऱ्यांची खत तुटवड्याची समस्या आहे. उद्या आणखी कुठल्या तालुक्यातही अशी परिस्थिती उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. लावणीनंतर शेतीला खत देण्याची वेळ निघून चालली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना खते वेळेत मिळावी, यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

आज उरण, पनवेल तालुक्यात कुठेच खत नाही, अशी माहिती खुद्द कृषी विभागाचे अधिकारी सांगतात. त्यामुळे यामागची भीषणता शेतकऱ्यांनी समजून घ्यावी. 'सण जाऊन सोमवारी' कोणती गोष्ट मिळत असेल, तर त्याचा उपयोग शून्य. त्यामुळे आरसीएफ कंपनीकडून खतांचा पुरवठा वेळेत होणे गरजेचे आहे. आज आरसीएफ कंपनीकडून रोजच्या रोज हजारो टन खतांची निर्मिती होऊन ते बाहेरील राज्यात पुरविले जाते, असे बोलले जाते. मग, या हजारो टनापैकी स्थानिक, म्हणजेच जिल्ह्यातील शेतकऱ्याला आवश्यक असणारे खत प्राधान्याने देणे, याला कंपनी व्यवस्थापन महत्त्व का देत नाही? अनेकदा शेतकऱ्यांकडून खताचा तुटवडा असल्याच्या बातम्या येत असतात. यावर उपाय करणार कधी? की स्थानिकांनी फक्त जमिनी द्यायच्या? याबाबत जिल्हा प्रशासनाने वेळीच लक्ष घालून शेतकऱ्यांना न्याय देणे गरजेचे आहे. आमचे जिल्हाधिकारी किशन जावळे साहेब एक शेतकरी प्रिय अधिकारी म्हणून शेतकऱ्यांमध्ये प्रसिद्ध आहेत. मागेच पांढऱ्या कांद्याची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसाठीसुद्धा त्यांनी प्रोत्साहन म्हणून योजना सुरू केलेय. त्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना मार्गदर्शनही केलेय. त्यामुळे त्यांना येथील शेतकरी, शेतजमीन याविषयी तळमळ आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाचे महत्त्व ते जाणून आहेत. त्यामुळे आरसीएफ प्रशासनाला त्यांनी वेळीच जाब विचारुन आधी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्राधान्याने खतपुरवठा करण्याचे निर्देश द्यावे, एवढीच अपेक्षा.

लोकसंसद

## भारतातील युपीआय व्यवहारांची उंच भरारी

भारतात युपीआय अर्थात युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस सेवेची सुरुवात एप्रिल २०१६ मध्ये झाल्यानंतर गेल्या नऊ वर्षात या सेवेचा प्रचंड विस्तार झाला असून डिजिटल पेमेंट प्रणालीमध्ये भारत जागतिक क्रमवारीत अव्वल ठरला आहे. भारतात आजच्या घडीला ४९ कोटीहून अधिक लोक यूपीआय सेवा वापरत असून या माध्यमातून दररोज ४४ कोटी व्यवहार पार पडत आहेत. नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या अहवालानुसार जुलै २०२५ अखेरपर्यंत यूपीआयद्वारे केल्या गेलेल्या १९.४७ अब्ज व्यवहारांमधून २५.०८ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त पेमेंट करण्यात आले आहे. गेल्यावर्षी जुलै २०२४ अखेरीस १४.४३ अब्ज व्यवहार नोंदवले गेले होते आणि २०.६४ लाख कोटी रुपये पेमेंट झाले होते. म्हणजेच डिजिटल पेमेंटमध्ये वर्षभरात अंदाजे ३५ टक्के इतकी वाढ झाली आहे. अगदी लहानात लहान व्यवहारांमध्येही पूर्णपणे सुरक्षित व वापरण्यास सहज सोपी असल्यामुळे भारतीयांच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग बनलेल्या यूपीआयच्या डिजिटल पेमेंट प्रणालीचे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनेही कौतुक केले आहे. भारतातील युपीआय व्यवहारांची उंच उंच भरारी येणाऱ्या काळात जगातील डिजिटल पेमेंट व्यवहारांचे अवकाश अधिकाधिक व्यापत जाणार यात तिळमात्र शंका नाही.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## मुख्यमंत्र्यांची बोलाचीच कढी, बोलाचाच भात

सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी ''सरकारचा पैसा आहे, आपल्या बापाचं काय जातं?'' असे वक्तव्य करत पूर्णतः बेजबाबदारपणा दाखवला आहे. सरकारचा पैसा म्हणजे करदात्याच्या घामाचा पैसा. त्याचा विनियोग योग्य प्रकारेच व्हायला हवा. हे भान मंत्र्यांना असणे आवश्यक आहे. या प्रकारातील अधिक धक्कादायक बाब म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोनच दिवसांपूर्वी सर्व मंत्र्यांना बोलण्यात संयम पाळण्याची तंबी दिली होती. पण तरीही असे वल्गनाचे वक्तव्य घडते, याचा अर्थ स्पष्ट आहे मुख्यमंत्र्यांचा धाकच राहिलेला नाही. किंबहुना महायुती सरकार चालवताना कराव्या लागणाऱ्या कसरतीतून आलेली ही हतबलता असावी. तसे नसेल तर फक्त तोंडी तंबी देऊन कसे होईल? वक्तव्यावर अंकुश हवा असे वाटत असेल, तर कृतीने दाखवा अन्यथा बेलगाम वक्तव्ये होतच राहतील हे नक्की.

**– दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

दिनविशेष

# दत्तो वामन पोतदार संयुक्त महाराष्ट्राचे शिलेदार

शिवछत्रपतींच्या राजधानीमुळे रायगड किल्ला तसेच सरखेल कान्होजी राजांच्या राजधानीमुळे कुलाबा किल्ला इतिहास प्रसिद्ध झाला आहे. तसेच या जिल्ह्यात हिमालयाची उंची गाठणाऱ्या व्यक्ती जन्मल्या आहेत. त्यांचे कर्तृत्व महाराष्ट्रापुरते सीमित नाही तर ते भारत देशालाही गवसणी घालते. यात क्रांतिकारक, समाजधूरिण,शिक्षणतज्ज्ञ, इतिहास तज्ज्ञ, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांचाही समावेश होतो. त्यांचा जन्म महाड तालुक्यातील बिरवाडी येथे दिनांक ५ ऑगस्ट १९२० रोजी झाला. प्रा. पोतदार यांचा जन्म बिरवाडी येथे झाला. त्यांचे मूळ आडनाव 'ओरपे'. पण त्यांचे पूर्वज आदिलशाहीमध्ये पोतदार (खजिना रक्षक) होते. तेथे प्रामाणिकपणे व कार्यक्षमतेने काम केल्यामुळे पोतदार हे नाव सर्वत्र परिचित झाले. म्हणून ओरपे ऐवजी 'पोतदार' हेच आडनाव त्यांनी धारण केले. अगाध बुद्धिमत्ता लाभलेल्या दत्तो पंतांचे भविष्य त्यांच्या वडिलांनी जाणले होते म्हणून त्यांना पुणे येथील नू. म. वि. या सुप्रसिद्ध शाळेत दाखल केले. एकपाठी असलेल्या दत्तोपंतांनी पहिला क्रमांक सोडलाच नाही. तेथे त्यांना प्रज्ञावंत शिक्षकांची साथ मिळाली. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन कॉलेजमध्ये झाले. तेथेही त्यांना प्रज्ञावंत प्राध्यापक लाभले. त्यामुळे त्यांच्या इंग्रजी, संस्कृत, उर्दू या भाषा परिपक्व झाल्या. ते वाक्स्पर्धेत प्राथमिक शाळेपासून भाग घेत असल्यामुळे पट्टीचे वक्ते बनले. मातृभाषेवर त्यांचे नितांत प्रेम होते. इंग्रजीसह अनेक भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. पण मातृभाषेच्या स्वाभिमानामुळे मराठी भाषेत लिहिताना अगर बोलताना ते एकही अन्य भाषेतील शब्द वापरत नसत. मातृभाषेप्रमाणे राष्ट्रभाषा हिंदी, अनेक भाषांची जननी संस्कृत तसेच जागतिक भाषा इंग्रजी यांची खोली व उंची त्यांनी वाढविली. इतिहास हा त्यांचा आवडीचा विषय होता. सत्य व वास्तव इतिहास वाचकांपर्यंत पोचण्यावर त्यांचा कटाक्ष होता. विविध काळात घडलेल्या इतिहासाचे सखोल वाचन करून त्यांनी पुरावे शोधले. पुराण कालीन वास्तु किल्ले, राजवाडे इत्यादींना भेट देऊन संबंधितांशी चर्चा करीत. अशाप्रकारे ते वास्तववादी इतिहास समोर ठेवीत.

वास्तववादी इतिहासाचे पाईक म. म. दत्तोपंत पोतदार वस्तुस्थितीवर आधारित, टीका टिपणी विरहित व पुराणकालीन दाखल्यांची जोड असलेला तसेच धर्मा धर्मातील तेढ दूर करणारा इतिहास जनतेसमोर यावा व इतिहास विषयाबाबत आवड निर्माण होण्यासाठी त्यांनी 'आधुनिक इतिहास भारतीय परिषदेची' (मॉडर्न इंडिया हिस्ट्री कॉन्फरन्स) स्थापना केली. प्राध्यापक पोतदार महाराष्ट्राचे पुराण पुरुष, महामहोपध्याय, साहित्य वाचस्पती, पत्रभूषण तसेच चतुरस्त्र पंडित होते. त्यांचे जीवन म्हणजे धगधगीत ध्येयनिष्ठा, कडकडीत त्याग व निस्पृह कर्मयोग यांचा त्रिवेणी संगम होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे महाराष्ट्राचा चालता बोलता इतिहास होय. त्यांनी विपुल लेखन केले. त्यांना डोळसपणे प्रवास करण्याची हौस होती. या हौसेपोटी त्यांनी भरपूर प्रवास केला. महामहोपाध्याय द. वा. पोतदार इतिहासाचे व शिवछत्रपतीचे गाढे अभ्यासक शिव छत्रपतींचा वास्तववादी इतिहास जनतेसमोर येण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'शिव चरित्र लेखनाची जबाबदारी' प्रा. पोतदार यांच्यावर सोपविली. दत्तोपंतानी सदर जबाबदारी मोठ्या आनंदाने स्वीकारली आणि कामकाजास सुरूवात केली. चरित्र लेखनाचे काम अनेक महिने चालू होते. पण नियतीच्या मनात वेगळेच होते. हे काम अंतिम टप्प्यात आले असतानाच दिनांक ६ ऑक्टोबर १९७९ रोजी त्यांना इहलोक सोडून जावे लागले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

५ ऑगस्ट

१) श्री.वसंत गंगाधर जोशी
अलिबाग, ०५-०८-१९५०

२) श्री.विलास मधुकर डोळस
चेंढरे-अलिबाग, ०५-०८-१९५५

३)विजय जयसिंग माने
अलिबाग, ०५-०८-१९५८.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

## सुवर्णकण



श्रीहरी प्राप्त होण्यासाठी आपल्याला सत्पुरुषांच्या संगतीची अत्यंत आवश्यकता आहे.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

# वाहतूककोंडीसह खंडित वीजपुरवठ्याचा
# इलेक्ट्रिक बस सेवेला फटका

**। पुणे । प्रतिनिधी ।**

पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर होणारी वाहतूककोंडी, महाराष्ट्र विद्युत वितरण महामंडळाचा (महावितरण) खंडित होणारा वीजपुरवठा याचा फटका महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) 'ई-शिवनेरी' या इलेक्ट्रिक बस सेवेला बसत आहे. कोंडीत जास्त वेळ अडकल्यास ऊर्जा जास्त खर्च होऊन बसच्या क्षमतेवर परिणाम होऊन ते उशिराचे कारण ठरते, तर खंडित वीज बस चार्ज करण्यात अडथळा ठरते. याचा विशेषत: मुंबई, ठाणे, दादर, बोरिवली, पुणे या बसच्या वेळापत्रकावर परिणाम होत आहे.

पुणे एसटी महामंडळाच्या स्वारगेट आणि स्टेशन आगारातून दररोज पहाटे पाचपासून रात्री उशिरापर्यंत दादर, बोरिवली, ठाणे या मार्गावर दर तासाने 'ई-शिवनेरी' सोडली जाते. तितक्याच बस दादर आणि मुंबई एसटी आगारातून पुणे मार्गावर धावतात. दिवसभरात जवळपास ५० हून अधिक 'ई-शिवनेरी'ची सेवा सुरू असते. पुणे-मुंबई प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आरामदायी सुविधा मिळावी, प्रवास सुकर होण्यासाठी सर्वाधिक ई-शिवनेरी बस या मार्गावर सोडण्यात येतात. या सेवेला प्रवाशांचा प्रतिसादही चांगला आहे.




- **वेळापत्रक कोलमडले**
- **प्रवाशांच्या तक्रारीत वाढ**

ई-शिवाई आणि ई-शिवनेरी या बस पुण्यातील शंकरशेठ रस्त्यावरील चार्जिंग स्थानकात चार्ज केल्या जातात. लोणावळा येथील घाट परिसर, वळणावळणाचे रस्ते, पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर लागणाऱ्या वाहनांच्या रांगा यामुळे या बस वाहतूक कोंडीत अडकून पडतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात ऊर्जा खर्च होते. त्यामुळे शेवटच्या स्थानकात पोहोचण्यास विलंब होतो, असे ई-शिवनेरीच्या चालकांकडून सांगण्यात आले.

> **मुंबई-द्रुतगती महामार्गावर वाहतुकीची मंदावलेली गती, इतर ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी आणि चार्जिंग स्थानकातील खंडित होणारा विद्युत पुरवठा यामुळे ई-शिवनेरी, शिवाई या बसच्या चार्जिंगसाठी वेळ लागत आहे. वेळापत्रकावर परिणाम होत असल्याने प्रवाशांच्या तक्रारी वाढल्या आहेत.**
>
> **-अरुण सिया, विभागीय नियंत्रक, एसटी महामंडळ**

### बस चार्जिंगवर परिणाम

पुणे एसटी महामंडळाचे स्वारगेट आणि शंकरशेठ रस्त्यावरील विभाग नियंत्रक कार्यालयात इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्थानक आहे. एक एसटी पूर्ण चार्ज होण्यासाठी दोन तासांचा कालावधी द्यावा वागतो. हे ध्यानात घेऊन या एसटीचे त्यानुसार वेळापत्रक निश्चित केले आहे. मात्र, गेल्या आठवडाभरापासून या परिसरात सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. वीजवितरण व्यवस्थेत समस्या येत असल्याचा परिणाम बस चार्जिंगवर होत असून, वेळापत्रकही कोलमडले आहे.

## टीसी कार्यालयात तोडफोड

**मुंबई :** दंडाच्या रकमेच्या वादातून टीसी कार्यालयात तोडफोडप्रकरणी एका प्रवाशाला बोरिवली रेल्वे पोलिसांनी अटक केली. राहुल रसाळ असे त्याचे नाव आहे. समशेर इब्राहिम हे पश्चिम रेल्वेत उपसीटीआय म्हणून काम करतात. शनिवारी (दि. ०२) दुपारी ते अंधेरी रेल्वे स्थानकातून निघालेल्या लोकलच्या प्रथम वर्गाच्या डब्यातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे तिकीट तपासात होते. तेव्हा राहुल हा प्रथम वर्गाच्या डब्यात प्रवास करत होता. त्याच्याकडे दुसऱ्या वर्गाचे तिकीट होते. त्यामुळे समशेर याने त्याला दंडाची रक्कम भरण्यास सांगितली. दंडाच्या रक्कमेवरुन वाद झाला. तिघांना समशेर हे फलाट क्रमांक १० येथील सीटी कार्यालयात घेऊन आले. तेव्हा राहुलने त्याच्याशी हुज्जत घातली. सरकारी कामात अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी त्याला अटक करून न्यायालयात हजर केले होते.

# प्रतिकूल हवामानाचा मासेमारीवर परिणाम

**● वातावरण बदलण्याची मच्छिमारांना प्रतीक्षा ; साखरीनाटे बंदरामध्ये शुकशुकाट**

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या नारळी पौर्णिमेमुळे समुद्राला आलेले उधाण, अजस्त्र लाटा आणि सोसाट्याचा वारा यामुळे नव्या हंगामाच्या शुभमुहूर्ताला मच्छीमारांना फटका बसला. प्रतिकूल वातावरण बदलण्याची मच्छीमार बांधवांना प्रतीक्षा आहे. त्यामुळे साखरीनाटे बंदरामध्ये शुकशुकाट पाहायला मिळाला.



तालुक्याच्या किनारपट्टीवर साखरीनाटे बंदर असून, दरदिवशी मच्छीमारीमधून लाखो रुपयांची उलाढाल होते. या ठिकाणी सुमारे पंचवीस पर्सनेट, दीडशे ते दोनशे फिशिंग ट्रॉलर, शंभर यांत्रिक होड्या, सुमारे पन्नास बिगर यांत्रिक होड्या असे मिळून तीनशेहून अधिक मच्छीमार नौका मच्छीमारी करतात. १ जून ते ३१ जुलैपर्यंत पावसाळी मासेमारीबाबतची बंदी संपल्यानंतर १ ऑगस्ट रोजी नवीन हंगाम सुरू होण्याच्या तयारीत मच्छीमार होते. मात्र, नव्या हंगामाला प्रतिकूल हवामानाचा फटका मच्छीमारांना बसला आहे. नेहमी नव्या मोसमात मिळणारे मासे या काळात पाऊस व वादळी वारे यामुळे मिळाले नाहीत. अनेक नैसर्गिक संकटांमुळे मासेमारीचे दिवस वाया जात असल्याने आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. त्यामुळे गेल्या तीन दिवसांमध्ये केवळ आठ ते दहा लाखांची उलाढाल झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

> **समुद्राला आलेले उधाण आणि त्याच्या जोडीने सोसाट्याचा वाराही वाहत आहे. पाण्याला काही प्रमाणात करंट अशा प्रतिकूल स्थितीमध्ये समुद्रामध्ये मच्छीमारी करणे मुश्किल आहे. त्यामुळे नव्या हंगामाच्या सुरुवातीलाच प्रतिकूल हवामानामध्ये मच्छीमारी करण्याचे मच्छीमारांनी टाळले. येत्या काही दिवसांमध्ये वातावरण अनुकूल होईल. त्यानंतर मच्छीमारीला सुरुवात होईल.**
>
> **– अमजद बोरकर, मच्छीमार नेते**

## तलावात बुडून तरुणाचा मृत्यू

**मुंबई :** बोरिवली येथील न्यू लिंक रोडवरील झाशीची राणी लक्ष्मीबाई तलावात रविवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास तरुण बुडाल्याची दुर्घटना घडली. मोहम्मद अल्ताफ शरीफ शेख (१८) असे त्या तरुणाचे नाव होते. संबंधित तरुणाला पोहता येत नव्हते. तलावात पडल्यानंतर पाण्यातून बाहेर येण्यासाठी त्याने अनेक प्रयत्न केले. मात्र, तो अयशस्वी ठरला. त्यानंतर पाण्यात कोणीतरी पडल्याचे एका मच्छीमाराच्या निदर्शनास आले. त्याने तातडीने पाण्यात उतरून युवकाला बाहेर काढले आणि उपचारासाठी नजीकच्या शताब्दी रुग्णालयात नेले. मात्र, डॉक्टरांनी अल्ताफ शेख याला मृत घोषित केले.

## पीक विमा योजनेला मुदतवाढ

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी जिल्ह्यात विविध नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य देण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यातील ८३ महसूल मंडळातील शेतकऱ्यांना भात व नाचणी या पिकांसाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदत होती. अर्ज करताना तांत्रिक अडचण लक्षात घेता तसेच अद्यापही कित्येक शेतकऱ्यांनी अर्ज न केल्यामुळे पीकविमा नोंदणीस १४ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

एका रुपयात सरंक्षण या घोषवाक्याने प्रसिध्द झालेली प्रधानमंत्री पीक विमा योजना यंदा नव्या स्वरूपात जिल्ह्यात लागू करण्यात आली. गुरुवारअखेर दुपारपर्यंत १ हजार २१४ शेतकऱ्यांनी २८.१६ हेक्टर क्षेत्रावरील पीक विम्यासाठी पीक विमा भरला आहे. दरम्यान, पीकविमा अर्ज नोंदणीसाठी अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यात १४ ऑगस्टपर्यंत योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे.

मागील वर्षी कर्जदार, बिगर कर्जदार शेतकरी मिळून १४ हजार ३२४ शेतकऱ्यांनी अर्ज केले होते. मागील वर्षाच्या तुलनेत यंदाची आकडेवारी फारच कमी आहे. अर्ज करताना शेतकऱ्यांना आलेली तांत्रिक अडचण लक्षात घेवून, शासनाने बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होणारी १४ ऑगस्ट तर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ३० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

## कर्जाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

**। नागपूर । प्रतिनिधी ।**

नरखेड तालुक्यातील शेतकरी आत्महत्येचे सत्र गेल्या काही वर्षापासून सुरू असून जलालखेडा येथे शुक्रवारी (दि. ०१) रात्री बाराच्या सुमारास एका तरुण शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. गणेश नामदेव कळंबे (४५) असे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव असून त्यांनी शेतीसाठी बँकेतून ७३ हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. सततच्या नापिकीमुळे कर्ज भरणे शक्य होत नव्हते. सततची नापिकी व शेतमालाला भाव नसल्यामुळे घेतलेले कर्ज फेडायचे कसे, असा मोठा प्रश्न गणेश यांच्यासमोर पडला होता. यातूनच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले.

गणेश कळंबे हे अत्यंत मेहनती तरुण शेतकरी असून त्याच्याकडे दीड एकर शेती आहे. शुक्रवारी रात्री सर्व झोपल्यावर तो घरातील अंगणात आला. त्याने बाहेरून दरवाजा बंद केला व अंगणातील लोखंडी रॉडला गळफास घेऊन आत्महत्या केली. पत्नीला जेव्हा जाग आला तर गणेश तिला घरात दिसला नाही. ती लगेच घराबाहेर यायला लागली तर दरवाजा बाहेरून बंद होता. खिडकीतून तिने बघितले असता तिला गणेश गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला. तिने लगेच बाजूला राहणाऱ्या चुलत दीराला फोन केला. तो लगेच तिथे आला व त्याने दरवाजा उघडला. या घटनेची माहिती पोलिसांना दिली असता पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले. गणेशला यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला. पोलिसांनी अकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# आर्थिक वादातून तरुणाची हत्या

**। पुणे । प्रतिनिधी ।**

मंचर शहरात भरचौकात धारदार शस्त्राने एकाची हत्या करण्यात आली. ही घटना शनिवारी (दि. ०२) रात्री दहाच्या सुमारास घडली. प्रशांत रवींद्र गांजाळे (वय ४५, रा. मंचर) असे हत्या करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. घटनेनंतर आरोपी पसार झाला होता; मात्र तीनही आरोपींना एका तासाच्या आत पोलिसांनी ताब्यात घेतले.

शहाजी वामन इंदोरे, सचिन सुदाम इंदोरे, प्रतीक शिवाजी इंदोरे (सर्व रा. चांडोली खुर्द, ता. आंबेगाव) या तिघांशी गांजाळे यांचा वाद झाला होता. यावेळी आरोपी शहाजी याने धारदार शस्त्राने गांजाळे यांच्या गळ्यावर वार केला. यात गांजाळे जखमी होऊन जागीच कोसळले. त्यांना तात्काळ मंचर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. आर्थिक व्यवहारातून हत्या झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

### तासाभरातच तिन्ही आरोपींना अटक

गांजाळेंवर वार करून आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला होता. मात्र, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील बडगुजर, पोलीस उपनिरीक्षक सुनील धनवे, यशवंत यादव यांच्या पथकाने एका तासाच्या आत आरोपींना अटक केली. घोडेगाव न्यायालयाने तीनही आरोपींना शुक्रवार दि. ०८ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## सैन्य अधिकाऱ्याने अनेकांना चिरडले

**नागपूर :** नागपूरमध्ये एकाने दारूच्या नशेत गाडी चालवून ३० लोकांना चिरडले आहे. या अपघातातील आरोपी अधिकारी हरषपाल महादेव वाघमारे (४०) हे भारतीय लष्करात कार्यरत असून सध्या आसाममध्ये तैनात आहेत. वाघमारे हमलपूरीच्या दिशेने जात असताना त्यांच्या गाडीवरून ताबा सुटून त्यांनी रस्त्यावर चालणाऱ्यांना बेदरकारपणे उडवले आणि त्यांची गाडी नाल्यात कोसळली. त्यानंतर उपस्थित नागरिकांनी वाघमारे यांना पोलिसांच्या ताब्यात दिले.

# पर्यावरण रक्षणासाठी विद्यार्थ्यांचा पुढाकार

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

चिपळूण तालुक्यातील चिवेली पंचक्रोशी विकास मंडळ संचलित आदर्श विद्यामंदिर चिवेली विद्यालयात 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्या आईच्या प्रेमाला व सन्मानाला समर्पित करत एक झाड लावले आणि त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला. विद्यालयातील सर्वच विद्यार्थ्यांनी या उपक्रमामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.



याउपक्रमाचाशुभारंभविद्यालयाचे मुख्याध्यापक संजय चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यालयात इको क्लबची स्थापना करण्यात आली. यामध्ये ऋग्वेद लाड, वेदांत गमरे, मानस गुजर, यश शिर्के, अथर्व पडवळ, अमान मुल्लाजी या विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शैलेश आंबरे, नितीन गुरव, महेश चव्हाण, यांनी प्रयत्न केले.

# स्मार्ट मीटरला स्थगिती देण्याची मागणी

### महाविकास आघाडीची महावितरणवर धडक

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

स्मार्ट वीज मिटर व अनियमीत पुरवठ्याच्या विषयावरून महाविकास आघाडीच्या वतीने शहरातील महावितरण कार्यालयावर सोमवारी धडक देण्यात आली. पदाधिकाऱ्यांनी स्मार्ट वीज मिटर विरोधातील संताप व्यक्त करीत नवीन मीटर बसवण्यास स्थगिती देण्याची मागणी केली. त्यानुसार कार्यकारी अभियंता धनंजय भांबरे यांनी स्मार्ट मीटरला चार दिवसाची तात्पुरती स्थगिती देत असल्याचे सांगितले.



महाविकास आघाडीचे नेते रमेश कदम, ठाकरे शिवसेनेचे विधानसभा क्षेत्राध्यक्ष बाळा कदम, काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा सोनललक्ष्मी घाग, तालुकाध्यक्ष लियाकत शाह, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष मुराद अडरेकर, शिवसेना तालुकाप्रमुख बळीराम गुजर, आदी महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पदाधिकारी म्हणाले, शहरासह तालुक्यात नागरिकांची संमत्ती नसतानाही जबरदस्तीने स्मार्ट विजमीटर बसवण्यात येत आहे. ज्यांच्या घरी कोणी नाही तेथेही लॉक तोडून मिटर बसवण्याचे प्रकार सुरू आहेत. ज्या-ज्या ठिकाणी नविन स्मार्ट विज मीटर बसवण्यात आले, तेथील ग्राहकांची विजबीले वाढल्याच्या तक्रारी आहेत. नागरिकांवर जबरदस्तीने मीटर बसवण्यात येऊ नयेत, या प्रक्रीयेला त्वरित स्थगिती देण्याची मागणी केली.

गेल्या चार वर्षाच्या तुलनेत विज पुरवठा खंडीत होण्याच्या घटना वाढल्या आहेत. नियमीत विजपुरवठा होत नसल्याने विद्यार्थ्यांसह, व्यापारी, व्यावसायीक, उद्योगधंदे, वैद्यकीय सेवा तसेच घरगुती विजवापरावर विपरीत परिणाम झाला आहे. नगरपरिषद व महावितरणच्या झालेल्या वादात नागरिकांना वेठीस धरले गेले. दोन शासकीय कार्यालयातील वादाचा बडगा सामान्य नागरिकांवर उगारणे ही गंभीर बाब असल्याचे सांगितले. त्यामुळे स्मार्ट मीटर बसवण्यापूर्वी जनजागृती व नागरिकांची संमत्ती घेण्यात यावी. नियमित खंडीत होणारा वीजपुरवठा सुरळीत करावा, नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निरसन करावे, अशी मागणी करण्यात आली. या मागण्यांच्या गांभीर्याने विचार न केल्यास महाविकास आघाडी तीव्र आंदोलन करेल, असा इशाराही दिला.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

**। चिपळूण । वार्ताहर ।**

चिपळूण वैश्य समाज चिपळूण या संस्थेतर्फे दहावी, बारावी तसेच विविध शाखांतील पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा रविवारी (दि. १७) सायं. ४ वाजता संस्थेच्या राधाताई लाड सभागृह, वैश्य भवन, चिपळूण येथे आयोजित करण्यात आला आहे. चिपळूण शहरातील वैश्य समाजाशी संबंधित आणि इयत्ता १० वीमध्ये किमान ७५ टक्के व १२ वीमध्ये ७० टक्के किंवा त्याहून अधिक गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा या कार्यक्रमात सत्कार केला जाणार आहे.

त्याचप्रमाणे कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय, विधी व न्याय इत्यादी शाखांतील पदवीधर विद्यार्थ्यांचाही गौरव केला जाणार आहे. या कार्यक्रमासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आपली गुणपत्रकाची छायांकित प्रत (झेरॉक्स) आणि मोबाईल क्रमांकासह १४ ऑगस्टपर्यंत संस्थेच्या कार्यालयात सभागृह व्यवस्थापक प्रदीप खेडेकर (मो. ९५०३६०३५३८) यांच्याशी संपर्क साधून सादर करावी. व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवलेली गुणपत्रके ग्राह्य धरली जाणार नाहीत, याची विद्यार्थ्यांनी विशेष नोंद घ्यावी. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमासाठी सहभाग नोंदवावा, असे आवाहन चिपळूण वैश्य समाजाचे अध्यक्ष पंकज कोळवणकर यांनी केले आहे.

# समृद्धीवरील वेगावर सीसीटीव्हीची नजर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावरील कसारा ते वडपे दरम्यानच्या अंतरातील वाहनांच्या अमर्यादित वेगावर आता सीसीटीव्हीची नजर राहणार आहे. अमर्यादित वेगापायी महामार्गावर मोठ्या संख्येने अपघाताच्या घटना घडत आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे महामार्गावर अमर्याद वेगाने धावणाऱ्या वाहनांवर नियंत्रण आणले जाणार आहे. वेगमर्यादेचे उल्लंघन झाल्यास ऑनलाईन दंड आकारण्यात येणार आहे.

महामार्गावर कारसाठी ताशी किमान १२० किमी. तसेच ट्रकसाठी ताशी किमान ८० किमी. अशी वेगमर्यादा निश्चित केली आहे. परंतु वेगमर्यादेचे उल्लंघन होत असल्याने वाहनांवरील नियंत्रण सुटून अपघातांच्या संख्येत वाढ झाली आहे. मात्र, आता वेगमर्यादा कॅमेऱ्यात टिपली जाणार असल्याने तसेच दंडाची कारवाईदेखील केली जाणार आहे.

प्रत्येक १ किमी अंतरावर एक कॅमेरा याप्रमाणे कसारा ते वडपे या अंतरात कॅमेरे बसविण्यात येत आहेत. सीसीटीव्ही कॅमेरे तपासणीच्या व्यवस्थेसाठी ठाणे जिल्ह्यात स्वतंत्र कंट्रोल रूम तयार करून त्यातून चित्रिकरण तपासले जाणार आहे.

### उत्पादकांना जैन इरिगेशनकडून मदतीचा हात | लागवडीपासून निर्यातीपर्यंत सहाय्य करणार

# वसईची केळी जाणार सातासमुद्रापार

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

वसईची केळी लवकरच सातासमुद्रापार जाणार आहेत. येथील केळी उत्पादकांना जैन इरिगेशनने मदतीचा हात देण्याचा निर्णय घेतला असून लागवडीपासून ते अगदी निर्यातीपर्यंत सर्व प्रकारचे सहाय्य केले जाणार आहे. विशेषतः चिलिंग फ्री केळी परदेशात पाठवणे शक्य होणार असल्याने वसईच्या केळींना पुन्हा वैभवाचे दिवस येणार आहेत. येथील उत्पादकांना टिश्यू कल्चर व जी नऊ प्रकारची रोपे दिली जाणार असून आवश्यक असलेले मार्गदर्शनदेखील करण्यात येणार आहे.



वसईची केळी ही एकेकाळी महाराष्ट्रासह संपूर्ण देशात प्रसिद्ध होती, पण गेल्या काही वर्षांपासून त्याचे उत्पादन कमी होत गेले. यासंदर्भात सुखसंपत्ती संवर्धन सहकारी सोसायटी व जैन इरिगेशनच्या तांत्रिक सहकाऱ्याने निर्यातश्रम केळी उत्पादन तंत्रज्ञानावर केळी परिषद घेण्यात आली. या परिषदेस आंतरराष्ट्रीय केळी तज्ज्ञ व जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष डॉ. के.बी. पाटील यांनी शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच, वाडा, तलासरी, मोखाडा, पालघर, वानगाव या भागात निर्यातश्रम केळीचे उत्पादन घेणे आधुनिक तंत्रज्ञानामुळे शक्य होणार आहे. मुंबईचे विमानतळ जवळ असल्याने केळींची निर्यात कमीत कमी वेळेत करणे शक्य होणार आहे.

> वसईसह ठाणे व पालघर जिल्ह्यामध्ये निर्यातीच्या दर्जाची केळी पिकवण्यासाठी अतिशय अनुकूल वातावरण आहे. तसेच, जैन टिश्यू कल्चर ग्रॅण्ड, नेन केळीची व्हायरस मुक्त रोपे, गादी वाफा, डबल लॅटरल व फर्टीगेशनचे तंत्रज्ञान वापरले तर दहा ते अकरा महिन्यांमध्ये केळीचे चांगले उत्पादन होईल.
>
> – डॉ. के.बी. पाटील, जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष

### दोनशेहून अधिक शेतकऱ्यांचा सहभाग

वसईतील दर्जेदार केळी सातासमुद्रापार पाठवण्यासाठी जैन इरिगेशनच्या तंत्रज्ञानाचा वापर मोफत करून देण्यात येईल अशी ग्वाही जॉन अल्मेडा प्रतिष्ठानचे चेअरमन ओनिल अल्मेडा यांनी दिली. या परिषदेस विद्यावर्धिनी ट्रस्टचे अध्यक्ष विकास वर्तक, फ्रान्सिस डिकॉस्टा, विन्सेंट अल्मेडा आदी उपस्थित होते. वसई व पालघर परिसरातील दोनशेहून अधिक शेतकऱ्यांनी परिषदेला हजेरी लावली.

## निवडक



### खालापूरात विविध दाखले वाटप

**खोपोली :** महसूल सप्ताह २०२५ अंतर्गत खालापूर तहसील कार्यक्षेत्रातील खालापुर मंडळात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत तहसीलदार अभय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ४ ऑगस्ट रोजी सरनोबत नेताजी पालकर सभागृह खालापूर येथे शिबीर पार पडला. सदर शिबिरात ॲग्रीस्टॅक, आधारकार्ड, आयुष्यमान भारतकार्ड, संजय गांधी योजना, जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, अधिवास दाखला, नविन मतदार नोंदणी व विविध दाखले वाटप करण्यात आल्याने उपस्थित नागरिकांनी महसूल विभागाच्या कामगिरी बाबत समाधान व्यक्त केला. यावेळी तहसीलदार अभय चव्हाण, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, महसूल नायब तहसीलदार विकास पवार मंडळ अधिकारी संदेश पानसरे, ग्राम महसूल अधिकारी आशिष राऊत, प्रतीक बापर्डेकर, सचिन किर्दत, किरण लोखंडे, सुवर्णा कोल्हे, शैला गवळी, महसूल सेवक सुरेश ठोंबरे उपस्थित होते तसेच मोठ्या संख्येने खालापूर मंडळातील नागरिक उपस्थित होते.

### शिवमंदिरात धार्मिक कार्यक्रम

**उरण :** कळंबुसरे गावातील जागुत स्वयंभू शिवमंदिर हजारो भाविकांचे श्रध्दास्थान बनले आहे. या मंदिरात महाशिवरात्री तसेच श्रावणी सोमवारी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. सोमवारी सकाळपासून भाविकांनी आपल्या कुटुंबासह श्री महादेवाच्या शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती. त्यावेळी शिवमंदिरात बम-बम भोलेचा गजर



घुमला. सदर शिवमंदिर हे तलावाच्या काठावर वसलेले असून या तलावातील दगडातून पुराण काळात अनेक मुर्ती घडविण्याचे काम सुरू होते. या तलावाच्या ठिकाणाहून वनवासात पांडवांनी आई एकवीरा देवीच्या आशिर्वादाने श्री महादेवाच्या पिंडीचे दर्शन घेऊन अज्ञात वासातील आपला प्रवास ही केला असल्याची आख्यायिका सांगितली जाते. निसर्गाची नवलाई, मांगल्य वादाचा घंटानाद हा शिव मंदिर परिसरातून कानात घुमत राहतो. कुठूनसा एक शांत गंभीर सूर कानी पडतो तो ओम नमः शिवाय. पुरातन काळापासून भक्तांचे श्रद्धास्थान असणाऱ्या स्वयंभू प्रवेश करता मनमोहक आणि तेवढीच तेजस्वी लिंग नजरेसमोर पडते. निसर्गाची नवलाई, मांगल्य वादाचा घंटानाद हा शिव मंदिर परिसरातून कानात घुमत राहतो. कुठूनसा एक शांत गंभीर सूर कानी पडतो तो ओम नमः शिवाय. मंदिरात गेल्यावर मनातील व्देष, मत्सर दूर पळून मनाला एक प्रकारची तृप्ती, प्रसन्नता मिळते.




### वसंतराव नाईक महाविद्यालयात आरोग्य विषयक व्याख्यान

**कोर्लई :** मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात प्राचार्य डॉ. जे. के. कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना व आजीवन शिक्षण विस्तार विभाग (डी.एल.एल.ई.) यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई येथील जीवन उर्जा फाऊंडेशनचे क्रांती चव्हाण यांचे आयुर्वेद व आरोग्य विषयक व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. आरोग्याला पोषक अशा शतावरी, अश्वगंधा, मुळेठी, मधुपत्र गोखरु, आवळा यांचे आयुर्वेदातील महत्व व रोग प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी कोणत्या वनस्पती फायदेशीर आहेत, याबाबत क्रांती चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. जे. के. कांबळे, प्रा. डॉ. एस. एस. भैरगुंडे, प्रा. डॉ. जी. डी. मुनेश्वर, डॉ.सिमा नाहीद, प्रा. मुस्कान रज्जब यावेळी उपस्थित होते.

### दिव्यांगांना प्रमाणपत्र वाटप

**कोर्लई :** महाराष्ट्र शासन,सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय रायगड-अलिबाग व मुख्यमंत्री सहाय्यता निधी धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने मुरुड ग्रामीण रुग्णालयात उषा चोले यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वाटप शिबीर संपन्न झाले. यावेळी डॉ. अशिष मिश्रा, डॉ. केतकी पाठक, डॉ. प्रफुल्ल धुमाळ, डॉ. अजय इंगळे, डॉ. अर्चना सिंग, राजेश पवार, विठ्ठल शिंदे व प्रतिमा फडतरे उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- पांढरे डाग करा मुळापासून नष्ट : औषधामध्ये आहे याचा परिणाम या औषधाचा करा वापर पांढरे डागापासून मिळवा मुक्ती. संपर्क : ८९६९१३५३८९ यावर कॉल करा. घरीबसल्या औषध मिळवा.
- Fresh graduates required for the post of office staff in Alibag. For interview call 9923750539, 9422383099
- ड्रायव्हर पाहिजे. ऑटोमॅटीक कार ड्रायव्हिंग येणारा ड्रायव्हर पाहिजे, ठिकाण : बामणसुरे, चोंढी. रविवारी सुट्टी. संपर्क :९०४९६५५५२३
- ऑफीसमध्ये कामाला मुलगी पाहिजे. पात्रता Bsc, आणि कॉम्प्यूटरची माहिती, वेळ : सकाळी ९ ते सायं. ६-३०, ठिकाण बामणसुरे, चोंढी, पगार : १०,००० महिना, रविवारी सुट्टी. संपर्क :९८२३५८५३२१
- घर भाड्याने/विकणे आहे. भाडे १८,०००/- डिपॉजिट ५०,०००/- चेंढरे संपर्क - ९१७५८००४३०
- वाघ्रण परिसरात ३ एकर जागेमध्ये भाडे तत्त्वार ४ तळे देणे आहे. राहण्यासाठी घर उपलब्ध आहे. संपर्क-माधुरी पाटील ९२०९८९५३५८
- विकणे आहे- भिवपुरी रोड स्टेशन वन रूम किचन फ्लॅट कमी किंमतीत विकायचा आहे. पोद्दार कॉम्प्लेक्स, फोन ०७०४५२१९८६९
- 'जन्नावार हॉस्पिटल' बायपास रोड चेंढरे-अलिबाग मध्ये नर्सची जागा (vacancy) आहे. Contact No 7798034509
- अलिबागमध्ये ब्युटी पार्लर कामासाठी अनुभवी मुले, मुली पाहिजे. मो. ८१४९८६५६२५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# रेवदंड्यात वाहतूक व्यवस्था कोलमडली

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिक हैराण; प्रशासनाची बघ्याची भूमिका

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

**रेवदंडा बाजारपेठेत रस्त्याच्या दुतर्फा बेशिस्तपणे उभ्या राहणाऱ्या वाहनांमुळे भीषण वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. खास करून गणेशोत्सवासारखे सण जवळ आले असताना खरेदीसाठी बाजारात येणाऱ्या लोकांची मोठी गैरसोय होत आहे.**

एकच मार्ग असल्याने अलिबाग, मुरूड, रोहाकडे जाणाऱ्या प्रवासी, विद्यार्थी, छोटे मोठे व्यापारी यांची रोड अरुंद असल्याने प्रचंड गर्दी व वाहतूक कोंडी होत आहे. तसेच रेवदंडा पंचक्रोशीतील नागरिक या बाजारात खरेदीसाठी येतात. मात्र अरुंद रस्ते, अव्यवस्थित पार्किंग, व अतिक्रमणामुळे वाहतूक ठप्प होते. रेवदंडा गोळा स्टॉप ते रेवदंडा हायस्कूल दरम्यान केळकर स्टॉप, अर्बन बँक, पारनाका इथून जाणाऱ्या दोन एसटी बस एकमेकांना जेमतेम पास होतात. त्यातच दुकानांचे अतिक्रमण, मच्छी विक्रेते, भाजी विक्रेते रोडवर ठाण मांडून बसत असल्यामुळे एसटी व इतर वाहन चालक घाबरत गाडी चालवतात.




> बाजारपेठेतील वाहतूक एकेरी केली तरी चालेल, कारण रेवदंडा येथे बायपास रस्ता उपलब्ध आहे. पण प्रशासनाने तातडीने निर्णय घेतला पाहिजे. सणासुदीच्या काळात जर तोडगा निघाला नाही, तर बाजारपेठेत जीवघेणे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, .
>
> – समिर (नान्या) आठवले
> सामाजिक कार्यकर्ते रेवदंडा

> रेवदंडा हे पर्यटकांचं आकर्षण ठिकाण आहे, पण वाहतूक व्यवस्था बघून लोक परत फिरतात आहेत, त्यासाठी प्रशासनच जबाबदार आहे.
>
> – निलेश खोत
> स्थानिक व्यापारी

पार्किंगची व्यवस्था नसल्याने नागरिकांना ट्राफिकमध्ये अडकून रहावे लागते. या दरम्यान, अपघाताची शक्यता वाढली असून, जीवित व वित्तहानी झाली तर याची जबाबदारी कोण घेणार? स्थानिक प्रशासन, पोलीस व तालुका प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष करत आहेत.

रायगड जिल्हाधिकारी, रायगड पोलीस अधीक्षक, यांचे याकडे लक्ष आहे का असे नागरिकांमधून बोलले जाते. त्यामुळे जनतेमध्ये संतापाची लाट पसरली आहे. रेवदंडा बाजारपेठेतील वाहतूक समस्या ही केवळ वाहतूक कोंडी नाही, तर एक प्रशासनाच्या निष्क्रियतेचा पुरावा आहे. गणेशोत्सवाच्या पाशर्वभूमीवर प्रशासन झोपलेले राहिले तर एखादा मोठा अपघात झाला तर जबाबदारी कोण घेणार असे बोलले जात आहे.

## लायन्स क्लबतर्फे तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

लायन्स क्लब ऑफ अलिबाग आणि मुरुड जंजिरा यांच्या संयुक्त विद्यमाने व पंचायत समिती शिक्षण विभाग मुरुड यांच्या सहकार्याने लोकमान्य टिळक पुण्यतिथीचे औचित्य साधून फर्स्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन प्रवीण सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरीय वक्तृत्त्वस्पर्धा संपन्न झाल्या. संपूर्ण तालुक्यातील साधारण एकशे पंचवीस प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या माध्यमातून अप्रत्यक्षरित्या दहा हजारांहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.




पहिली ते चौथीच्या गटात विदिशा इंगळे प्रथम क्रमांक, संस्कृती वडवले द्वितीय, तर मृणाली म्हात्रे हिने तृतीय क्रमांक पटकावला. पाचवी ते सातवी गटात पार्थ पाटील, सहर्ष हेमंत, तर आरोही पाटील यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावला.

आठवी ते दहावी या माध्यमिक गटातून सार्थक कौलकर प्रथम, देवेश्री गुरव द्वितीय तर आर्या विचारे हीने तृतीय क्रमांक मिळवला. विजेत्यांना शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आली.

यावेळी पंचायत समिती मुरुडचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, लायन्स क्लब ऑफ अलिबाग अध्यक्ष प्रदीप नाईक, महेश कवळे तर मुरुड जंजिरा लायन्स क्लबचे अध्यक्ष सनी सोगावकर, मकरंद कर्णिक, विजय वनगे, विजय शिंदे, संतोष नागावकर, अविनाश राऊळ, नितीन शेडगे, प्रकाश देशमुख, नितीन पाटील, विनोद कवळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किशोर गंभे , दीनेश म्हात्रे, जितेंद्र मकू, राजेंद्र नाईक, प्रवीण भगत, रमाकांत ठाकूर, शरद पाटील, प्रियंका पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश कवळे यांनी केले होते.




## राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत वृक्षारोपण

। तळे । प्रतिनिधी ।

जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स तळाच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत वृक्षारोपण सोमवार (दि.४) ऑगस्ट रोदी करण्यात आले. या दिवशी महाविद्यालयाची स्थापना झाली असून गेल्या १५ ते १६ वर्षात अनेक उपक्रम रा.सेयोजना विभाग राबत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ४ ऑगस्ट रोजी डॉ सचिन बंगाळे व डॉ नसरीन शेख यांचे मार्गदर्शनाखाली वृक्षरोपणाचा कार्यक्रम आयोजन करण्यात आला होता. यावेळी डॉ. विवेक राणे, प्रा किरण गावडे, प्रा अमोल निकम, शत्रुघ्न धवण, महेंद्र बिरवाडकर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## खुटील येथे स्वच्छता मोहीम यशस्वी



। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील खुटिल पंचक्रोशीतील पाणी साठवण टाकीची संवर्धनासाठी पंचक्रोशीतील स्थानिक ग्रामस्थांनी पुढाकार घेतला आहे. पावसाळ्यात पिण्याच्या पाण्याच्या विहिरीची साफ सफाई करून स्वच्छ पाणी मिळण्याच्या हेतूने महाड तालुक्यातील खुटिल येथील ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या साठवण पिण्याची टाकीची स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

खुटिल ग्रामपंचायत मार्फत असणाऱ्या पाच पाणी पुरवठा टाक्यांची स्वच्छता मोहीम खुटिल पंचक्रोशीतील खुटिल मुळगाव, रामवाडी, हनुमानवाडी बौध्दवाडी ग्रामस्थांचा सहभाग घातला होता. नळ पाणी योजनेच्या साठवण टाकीच्या व विहिरीच्या आजू बाजूला असणारे रान गवत तोडून परिसर मोकळा करण्यात आला. नव्याने साचणारे पावसाचे पाणी दूषित होऊ नये म्हणून दरवर्षी प्रमाणे एक दिवस पिण्याच्या पाण्यासाठी स्वच्छतेच्या स्वरूपात श्रमदान मोहीम राबवून संपूर्ण गावाच्या आरोग्याची काळजी घेण्यात आली.

यात्रसंगी किसन आंबेकर, गोपाळ धाडवे, जनार्दन मोरे, मोहन धाडवे, गणेश धाडवे, अनंत निंबरे, राजेद्र आंबेकर, मंगेश धाडवे, अजित धाडवे,अरुण पवार, संजय सकपाळ, भाऊ होडबे, प्रकाश वाडकर, भरत होडबे, दिलीप पार्टे, दत्ताराम पार्टे, बबन मालुसरे, संदीप सकपाळ, विष्णु जोगळे, अनंत जोगळे, सुरेश सुकूम, काशीराम भुवड, पांडुरंग जऊल, परशुराम जऊल, विजय कांदळेकर, हरिचंद्र कांदळेकर, काशीनाथ सुकूम, दिनेश जऊल, गोविंद जऊल, प्रभाकर जाधव, सौरभ जाधव याच्यासह अनेक नागरिक श्रमदानात सहभागी झाले होता.

## पारंपरिक नृत्य स्पर्धेचे आयोजन

। महाड । प्रतिनिधी ।

महाड शहर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षतर्फे श्रावन महिन्याचे औचित्य साधत मंगळागौर व पारंपरिक नृत्य स्पर्धेत २०२५ चे आयोजन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात रविवारी करण्यात आले होते. या स्पर्धेत १५ महिला गृपने सहभाग नोंदवत आपली परंपरा व संस्कृतीचे दर्शन देत सांस्कृतिक ठेवा जपला आहे. या स्पर्धे दरम्यान, विशेष नृत्य कलाविष्कार म्हणून लिटिल चॅम्प्स् ग्रुप, महाड मुक्तांगण दिव्यांग मुलांची केंद्र महाड यांनी नृत्य सादर करत



उपस्थित महिलांची दाद मिळवली. या स्पर्धेत नवेनगरचा रणरागिणी गृपचा प्रथम क्रमांक आला.

या स्पर्धेत शिवकन्या ग्रुप, कोल-होडबेआळी उमेद ग्रुप करंजखोल, समग्र योगा ग्रुप महाड, आदिवासी ग्रुप काळीज, भरारी ग्रुप महाड, नथिचा नखरा ग्रुप महाड, विठ्ठल रुक्मिणी ग्रुप कोल, जय जिजाऊ ग्रुप महाड, रणरागिनी ग्रुप नवेनगर, ओमकार ग्रुप खरवली , डि. सी. ग्रुप नवदुर्गा ग्रुप महाड, श्री गणेश महिला मंडळ चांभारखिंड या ग्रुपने सहभाग नोंदवत आपली परंपरा व सांस्कृतिक ठेवा अविरत जपला आहे.

या कार्यक्रमात १५ गटातून मधून उत्तम नाच करत नवेनगर मधील रणरागिणी ग्रुपने प्रथम क्रमांक पटकावला. तर डी. सी ग्रुप दुसरा क्रमांक पटकावला, ओमकार ग्रुप खरवली यांना तिसरा क्रमांक देण्यात आला. उत्तेजनार्थ म्हणून नथिचा नखरा ग्रुप महाड भरारी ग्रुपला प्रत्येकी पाच हजार व सन्मानचिन्ह मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून परिक्षक कादंबरी प्रशांत वैद्य, तेजस गणपत जाधव यांनी काम केले.

## शिवमंदिरात शिवाभिषेक

**माथेरान :** श्रावणी सोमवार निमित्ताने येथील कोकण वासीय समाज संस्थेने समाजाच्या माध्यमातून येथील शिवमंदिरात शिवाभिषेक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सुश्राव्य भजन तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन मंदिरात करण्यात आले होते. याप्रसंगी चंद्रकांत सुतार, रवींद्र परब, शैलेंद्र दळवी, राजेश दळवी, ललित पांगसे, सारिका पाटील, मंदिरा दळवी, परेंदु मोरे, स्वर्णीमा दळवी तसेच कोकणवासीय समाजातील पुरुष, महिला, मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गायमुख शाळेत करिअर मार्गदर्शन

। तळा । प्रतिनिधी ।

गायमुख शाळेत विद्यार्थ्यांसाठी आरोग्य विषयक टिप्स आणि स्पर्धा परीक्षांच्या महत्त्वावर डॉ. विनया कांबळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी पावसाळ्यात होणारे विविध आजार, त्यांची लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपायांवर माहिती दिली. विशेषतः किशोरवयीन मुलींना भेडसावणाऱ्या आरोग्य समस्यांवर त्यांनी मोकळेपणाने चर्चा करुन त्यावर उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना निरोगी जीवनशैलीसाठी आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या



टिप्सही देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात डॉ. कांबळे यांनी स्पर्धा परीक्षांचे महत्त्व विशद केले. मंथन, नवोदय आणि शिष्यवृत्ती यांसारख्या तसेच जेईई, नीट, सिईटी परीक्षांचे स्वरूप व पर्यायी करिअर दिशा याचबरोबर तयारी कशी करावी आणि त्यांचे भविष्यातील फायदे यावर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रश्नांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य, पालकवर्ग, कृष्णा कांबळे, आमिष भौड, भुरे तसेच गायमुख व पन्हेळी हायस्कूलमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

महाड-पोलादपूर मंडळाने जपला सांस्कृतिक वसा | मंगळागौरी खास पर्वणीचा दिवस

# कुणबी महिला मंडळाचा अनोखा उपक्रम

। महाड । प्रतिनिधी ।

**सोशल मीडिया, इंटरनेट, मोबाईल वापरामध्ये सध्याची मंडळी व्यस्त असतात, चार चौघे एकत्र आले तरी त्यांना बोलायला वेळ नसतो, सगळयांच्या नजरा मोबाईलमध्ये लागलेल्या असतात. मात्र यापूर्वीची लोकं गुण्यागोविंदाने एकत्र पारावर गप्पा मारायची, सणासुदीला महिला झिम्मा फुगडीचा खेळ सणवारीला खेळायच्या या सर्व गोष्टी कुठं तरी हरपल्या तर आहेच शिवाय लुप्त होत आहेत. नेमका हाच धागा पकडून कुणबी समाजोन्नती संघ मुंबई शाखा महाड पोलादपूर अंतर्गत महिला मंडळ व कुणबी युवक यांच्या वतीने कुणबी ज्ञाती गृह वाघे हॉल परळ मुंबई येथे जागर मंगळागौर पार पडला असून सध्याच्या या धावपळीच्या काळात आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविले असून या कार्यक्रमात तालुक्यातील अनेक महिलांनी सहभाग दर्शवून या कार्यक्रमाचा आनंद द्विगुणित केला सर्व समाज भगिनी अगदी कार्यक्रमात तल्लीन झाल्या होत्या.**

श्रावण म्हटला की विविध सण उत्सवाची रेल चेल आणि त्यामुळे सर्वत्र उत्साहाचे व आनंदाचे वाता-वरण असते, श्रावण महिन्याच्या दुसऱ्याच दिवशी मंगळागौरी पूजनाला सुरुवात झालेली असते. असे म्हणतात की, पती-पत्नीमधील प्रेम आणि निष्ठा वाढावी यासाठी शिवपार्वतीचा आशिर्वाद आणि त्यांची कृपादृष्टी मिळवण्यासाठी ही पूजा केली जाते. महिला मंडळाच्या



महिलाध्यक्ष दीपिका मौले यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, मंगळागौरीचा सण हा महिलांसाठी एक खास पर्वणीचा दिवस असतो, जो त्यांना एकत्र आण-तो आणि त्यांच्यातील पारंपरिक संस्कृती जपून कलागुण जोप-ासतो. कुणबी समाजासह बहुजन समाजाच्या समाजात या सणाला विशेष महत्त्व आहे. या समाजात मंगळागौरीचे सण मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरे केले जातात. यादरम्यान फुगडी, आट्यापाट्या, झिम्मा, पारंपरिक नृत्य, गाणे या सर्व मंगळागौरीच्या वेळी खेळण्यात आले असून साधारणत दहा ते पंधरा प्रकारचे खेळण्यात आले असून यामध्ये भवानी नडगांव येथील महिलांचा विशेष योगदान असून त्यांचे कौतुक आणि सत्कार करण्यात आले.

कुणबी समाजोन्नती संघ मुंबई महाड पोलादपूर शाखेचे अध्यक्ष सत्यवान यादव, नितीन पाष्टे, विशाल गोलांबडे, मितेश नवले, प्रसाद धारशे, अशोक आंबेकर, दत्ता देवळे आदीं मान्यवरांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी ज्योती महाडिक, दीपिका मौले, विनया गोडांबे, श्वेता राणे, मृणाल हमणे, श्रुती निंबरे, किर्ती जोगळेकर, भारती पिचुर्ले, संस्कृती कांदळेकर, वृषाली धाडवे, रुपाली शिंदे, वर्षा शिंदे, विद्या निंबरे, प्रियंका बैकर, नुरी पाष्टे तसेच महाड पोलादपूर तालुक्यातील महिला उपस्थित होते.

> मंगळागौर कार्यक्रम हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून एक सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन सामाजिक एकोपा वाढीस व सामाजिक कार्यप्रणाली मजबूत व्हावी या उद्देशाने सदर कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.
>
> – ज्योती महाडिक
> माजी महिलाध्यक्ष

# औषधी वनस्पती अभ्यास सहलीद्वारे वर्षा ऋतूचा आनंद

**कर्जत** : रायगड मेडिकल असोसिएशन आणि आयुर्वेद व्यासपीठ रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने पाली (सुधागड) जवळील सिद्धेश्वर परिसरात औषधी वनस्पती अभ्यास सहल व पावसाळी सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुळकर्णी, डॉ. प्रशांत गांगल, डॉ. शर्वाणी कुळकर्णी, डॉ. श्रद्धा नाजीरकर, डॉ. मृदुला जोशी, नम्रता म्हाळसेकर-गांगल, डॉ. निशिका कारंडे, उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक श्री. शिवाजी यशवंत ठोंबरे, रा. कोशाणे, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोशाणे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| ४२ | १ | ०-५७-६० | ३=९४ |

पैकी विक्री केलेले क्षेत्र १७ गुंठे

सदर मिळकतीचा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. ५/८/२०२५

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस एल.एल.बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं. ४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता. कर्जत जि. रायगड
मो.नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल सौ. आशा अशोक पाटील राहणार- समर्थ फार्म हाऊस जवळ, पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची व खुद्द ताबेकब्जा वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत असून सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांनी श्रीमती सुनिता बाळकृष्ण खामकर वगैरे यांचे विरूद्ध मा. जिल्हा न्यायाधिश सो. अलिबाग यांच्याकोर्टात नियमित दिवाणी अपिल क्र. ३४/२०२५ चे अपिल दाखल केलेले आहे. श्रीमती सुनिता बाळकृष्ण खामकर तर्फे अखत्यारी श्री. अजय यशवंत सावंत हे उत्तरार्थी अखत्यारी आमचे अशिलांचे हक्क डावलून आमचे अशिलांना फसवून आमचे अशिलांचे अपरोक्ष खालील नमुद केलेली मिळकत ही इतर इसमांना विकण्याच्या तयारीत आहे.

**अपिल मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| मौजे पोयनाड तालुका अलिबाग | ७९/३ | ०-५३-६<br>पो.ख. ०-०१-५<br>एकूण ०-५५-१ | १२-९४ |

तरी मिळकतीसंदर्भात सदर अपिलातील वर नमूद केल्याप्रमाणे उत्तरार्थी श्रीमती सुनिता बाळकृष्ण खामकर तर्फे अखत्यारी श्री. अजय यशवंत सावंत हे अखत्यारी आमचे अशिलांचे हक्क डावलून आमचे अशिलांना फसवून आमचे अशिलांचे अपरोक्ष सदर मिळकत त्रयस्थ इसमांस विकणेचे तयारींत आहे तसा कुठलाही व्यवहार सदरचे अपिल प्रलंबित असताना आमचे अशिलांचे अपरोक्ष केल्यास व आमचे अशिलांचे हक्कास कमीपणा येईल असा व्यवहार केल्यास त्या व्यवहारास आमच्या अशिलांची सक्त हरकत असेल व तसे केल्यास सदर व्यक्ती सदर मिळकतीचे प्रामाणिक खरेदीदार (Bonafide Purchaser for Value Without notice) होणार नाहीत. तसेच अशा प्रकारचा कोणताही व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. तरी कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा व्यवहार केल्यास भविष्यातील कोर्टकारवाईस संबंधीत इसम जबाबदार राहतील हे कळावे.

अलिबाग,
दि. ०४-०८-२०२५.

सही/-
**ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु बिल्डींग, राम मंदिर शेजारी
ब्राम्हण आळी अलिबाग

## पेण शिक्षण महिला समितीच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस २०२४-२०२५

प्रती,
श्री/श्रीमती. .............................. यांसी.

पेण शिक्षण महिला समितीच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. १३-०८-२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता शिशु विकास मंदिरात होणार आहे. तरी आपण सदर सभेस अवश्य उपस्थित राहावे हि विनंती.

**-: सभेची कार्यक्रम पत्रिका :-**

१) मागील सभेचे सन २०२४-२०२५ चे इतिवृत वाचून मंजूर करणे.
२) सन २०२४-२०२५ चे वार्षिक जमाखर्च वाचून मंजूर करणे.
३) सन २०२४-२०२५ चे वार्षिक अहवाल वाचून मंजूर करणे.
४) सन २०२५-२०२६ साठी लेखा परीक्षकांची नेमणूक करणे.
५) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळची कामे.

**-: विशेष सूचना :-**

१) ज्या सभासदांना संस्थेचे सन २०२४-२०२५ चे जमाखर्च पहावयाचे असतील त्यांना दि. ०८-०८-२५ ते दि. ११-०८-२५ या दिवशी शिशु विकास मंदिरात दुपारी २ ते ४ या वेळेत पहावयास मिळतील.

२) ज्या सभासदांना आयत्या वेळेच्या कामात सूचना करावयाच्या असतील तर दि. १२-०८-२५ रोजी दुपारी (११ ते २) या वेळेत शिशु विकास मंदिरात दुपारी लेखी आणून द्याव्यात.

३) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच ठिकाणी अर्धा तास थांबून असलेल्या सभासदांतच सभेचे कामकाज पूर्ण करण्यात येईल.

आपली नम्र
**सेक्रेटरी (सौ. अंजली डोंगरे)**
(पेण शिक्षण महिला समिती)

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या जमिन मिळकतीबाबत विद्यमान मालक यांचेबरोवर चर्चा/वाटाघाटी आमचे अशील करत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बोरीस ता. अलिबाग | ५०/२/अ | जिरायत ०-८२-५०<br>पो.ख. ०-०३-६०<br>एकुण ०-८६-२० | ५.३१ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्री. बाळकृष्ण सावरमल शहा यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असल्याचा व कायदेशिर हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील सदरबाबत कोणताही व्यवहार ठरविणेपुर्वी खातरजमा करणेसाठी ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे. तरी या जाहीर नोटीसने सर्वांना असे कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती ह्या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल विद्यमान मालकांबरोबर व्यवहार ठरवतील व त्यानंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक - ०४/०८/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२
पक्षकाराचे मान्यतेची स्वाक्षरी
श्री.बाळकृष्ण सावरमल शहा

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण, पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग.

आर डी सी सी बँक

### निविदा सूचना

बँकेच्या ६० शाखांमधील फेकनोट काउंटींग मशिन, बंडलनोट काउंटींग मशिन सर्व्हिसिंग करणेच्या आहेत.

तरी या क्षेत्रांतील अनुभवी इंजिनिअर/सहकारी संस्था यांचेकडून निविदा मागविणेत येत आहेत वरील नोट काउंटींग मशिन सर्व्हिसिंगच्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक ०५/०८/२०२५ ते ११/०८/२०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यांत सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेंत येईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा अगर निविदेमधील कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

सही/-
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांक : ०५/०८/२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे बेकरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिनींच्या मिळकती त्या मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री. संजीवकुमार रघुबीरसिंग शर्मा यांचेकडुन आमचे अशिलांनी कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे बेकरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिनींच्या मिळकती**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| ७४ | ४ | ०.१७.००<br>पो.ख. ०.०२.००<br>एकुण क्षेत्र ०.१९.०० | ०.१९ |
| ७४ | ६ | ०.९३.००<br>पो.ख. ०.३६.००<br>एकुण क्षेत्र १.२९.०० | ०.७८ |
| ७९ | २/अ | २.४३.००<br>पो.ख. १.७०.००<br>एकुण क्षेत्र ४.१३.०० | १.९२ |
| ७९ | २/ब | २.२६.००<br>पो.ख. १.५९.००<br>एकुण क्षेत्र ३.८५.०० | १.७५ |

सदर मिळकती व त्यातील तदंगभुत सर्व हक्कहितसंबंध सुध्दा कायम विकत घेणेचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतींबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, मृत्युपत्रांकीत दान, साठेकरार, बयाणा पावती, खरेदीखत, ताबाकब्जा, वहिवाट, पोटगी, लीन, चार्ज, भाडेपट्टा, जाणे येणेचे मार्ग, वारसाहक्क वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ०७ (सात) दिवसांचे आत खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकती या निर्वेध व बोजाविरहित असल्याचे आमचे अशिल समजतील. तसेच कोणाचीही हरकत असल्यास ती त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिली आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतींबाबत खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमचे अशिलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पत्ता :- ''श्री सद्गुरु कृपा', १४८४,
शेलु रेल्वे स्टेशन जवळ, मु. पो. शेलु,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१.

**ॲड. संदिप गोपाळ बागडे**
खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट
मो. ९८६०६२६२४६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे बेकरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिनींच्या मिळकती त्या मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार श्रीम. हंसाबेन नलिनभाई हिरपरा (पटेल) व श्री. नलिनभाई वल्लभभाई हिरपरा (पटेल) यांचेकडुन आमचे अशिलांनी कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे बेकरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिनींच्या मिळकती**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| ६४ | ११ | ०.१७.००<br>पो.ख. ०.००.००<br>एकुण क्षेत्र ०.१७.०० | ०.२५ |
| ७५ | १ | ०.२९.१०<br>पो.ख. ०.०१.००<br>एकुण क्षेत्र ०.३०.१० | २.२९ |
| ७८ | ३/ब | ०.६१.००<br>पो.ख. ०.१७.००<br>एकुण क्षेत्र ०.७८.०० | ०.५२ |
| ७८ | ३/ड | ०.३८.००<br>पो.ख. ०.१९.००<br>एकुण क्षेत्र ०.५७.०० | ०.३१ |
| ७८ | १०/ब | ०.७३.००<br>पो.ख. ०.३३.००<br>एकुण क्षेत्र १.०६.०० | ०.७५ |
| ७८ | १२/अ | ०.२८.००<br>पो.ख. ०.१८.००<br>एकुण क्षेत्र ०.४६.०० | ०.२० |
| ७८ | १२/ब | ०.१६.००<br>पो.ख. ०.०९.००<br>एकुण क्षेत्र ०.२५.०० | ०.१२ |
| ७८ | १२/ड | ०.०८.००<br>पो.ख. ०.०४.००<br>एकुण क्षेत्र ०.१२.०० | ०.०६ |
| ७८ | १३ | ०.८७.००<br>पो.ख. ०.५३.००<br>एकुण क्षेत्र १.४०.०० | ०.६४ |
| ८१ | १ | १.०५.००<br>पो.ख. ०.४२.००<br>एकुण क्षेत्र १.४७.०० | ०.७७ |
| ८१ | ३/अ | ०.२९.५०<br>पो.ख. ०.१५.००<br>एकुण क्षेत्र ०.४४.५० | ०.२२ |
| ८१ | ३/ब | ०.२९.५०<br>पो.ख. ०.१५.००<br>एकुण क्षेत्र ०.४४.५० | ०.२० |
| ८१ | ५ | २.२०.००<br>पो.ख. ०.८९.००<br>एकुण क्षेत्र ३.०९.०० | १.७२ |
| ८१ | ७/ब | ०.६८.००<br>पो.ख. ०.५८.००<br>एकुण क्षेत्र १.२६.०० | ०.५२ |
| ८१ | ८ | ०.९६.००<br>पो.ख. ०.५८.००<br>एकुण क्षेत्र १.५४.०० | ०.६९ |
| ८१ | ११ | ०.१०.००<br>पो.ख. ०.०१.००<br>एकुण क्षेत्र ०.११.०० | ०.०९ |
| ८२ | १२ | ०.०९.००<br>पो.ख. ०.०४.००<br>एकुण क्षेत्र ०.१३.०० | ०.०८ |
| ८२ | २१ | ०.२०.००<br>पो.ख. ०.०३.००<br>एकुण क्षेत्र ०.२३.०० | ०.३१ |
| ८२ | २२ | ०.७३.००<br>पो.ख. ०.०६.००<br>एकुण क्षेत्र ०.७९.०० | ०.९२ |
| ८३ | ८ | ०.१५.७०<br>पो.ख. ०.००.५०<br>एकुण क्षेत्र ०.१६.२० | ०.६६ |
| ८७ | २ | ०.१०.४०<br>पो.ख. ०.०१.९०<br>एकुण क्षेत्र ०.१२.३० | १.८१ |

सदर मिळकती व त्यातील तदंगभुत सर्व हक्कहितसंबंध सुध्दा कायम विकत घेणेचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतींबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, मृत्युपत्रांकीत दान, साठेकरार, बयाणा पावती, खरेदीखत, ताबाकब्जा, वहिवाट, पोटगी, लीन, चार्ज, भाडेपट्टा, जाणे येणेचे मार्ग, वारसाहक्क वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ०७ (सात) दिवसांचे आत खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकती या निर्वेध व बोजाविरहित असल्याचे आमचे अशिल समजतील. तसेच कोणाचीही हरकत असल्यास ती त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिली आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतींबाबत खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमचे अशिलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पत्ता :- 'श्री सद्गुरु कृपा', १४८४,
शेलु रेल्वे स्टेशन जवळ, मु. पो. शेलु,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१.

**ॲड. संदिप गोपाळ बागडे**
खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट
मो. ९८६०६२६२४६

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र(हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वलवली ता.अलिबाग, जि.रायगड | ७४/२/अ | ००.२७.०० | ०.१७ |

वर वर्णन केलेली मिळकत आमचे आशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक सतीश बाळकृष्ण गोतावडे यांच्या सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध ताबाकब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य दस्त कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीसीच्या तारखेपासून ०८ दिवसाच्या आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतेही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भात नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबंधीतांनी नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ३१/०७/२०२५

**ॲड.अमर अशोक घरत**
मु.पो.थळ, पेठ नाका,
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक श्री.सुरेश भालचंद्र परकर रा.थेरोंडा-खंडेरावपाडा, पो.चौल, ता. अलिबाग, जि.रायगड यांच्या नांवे असलेल्या बागायत मिळकतीपैकी अविभक्त हिस्सा माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र.व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| रेवदंडा ता.अलिबाग | १२५/२ | ०-०७-९०<br>पो.ख.०-०५-००<br>एकूण ०-१२-९० | २.४० |

वर नमूद मिळकत व या मिळकतीमधील ०-०४-५० हे. आर. बागायत मिळकतीपैकी श्री.सुरेश भालचंद्र परकर यांचा असणारा अविभक्त हिस्सा व श्री.सुरेश भालचंद्र परकर यांचे नांवे असलेले ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा घर क्र.२११३ यासह.

सबब सदरहू मिळकतीमधील विद्यमान मालक सुरेश भालचंद्र परकर यांनी त्यांचा असलेला हिस्सा निर्वेध असल्याचा निर्वाळा दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू बागायत व घर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक :  /०८/२०२५

सही/-
**ॲड.धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना सदर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे आक्षी, ता.अलिबाग येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीमधील ०-४०-०० हे.आर क्षेत्र मिळकतीचे विद्यमान मालक तुलसी विलास बुरांडे रा. आक्षी, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तसा करार आमचे अशिल व विद्यमान जमीन मालक यांच्यामध्ये झालेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| आक्षी ता.अलिबाग, जि.रायगड | ५३ | १-२९-८०<br>पो.ख. ०-०९-२०<br>एकूण १-३९-०० | १९-९३ |

वर नमूद मिळकतींपैकी ०-४०-०० हे.आर क्षेत्र

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. ५.८.२०२५

**ॲड.मच्छिंद्र एस.म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे पिटकिरी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री.सुरेश रघुनाथ पाटील, प्रेमला रमेश पाटील, श्री.विनोद रमेश पाटील, श्री.हितेंद्र रमेश पाटील, श्री.अजित रमेश पाटील, सौ.स्वाती अरविंद पाटील, राहणार पिटकिरी, ता.अलिबाग यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री.सुरेश रघुनाथ पाटील, वगैरे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| पिटकिरी, ता.अलिबाग. | १४२ | ०-६१-५०<br>०-०४-३० पो.ख.<br>०-६५-८० एकूण | ७-५१ |

अलिबाग,
दिनांक : ०४/०८/२०२५

सही /
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
ए विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल-४१०२०६.**

**-: जाहिर सूचना :-**

विषय :- सार्वजनिक गणेशोत्सव मंडप परवानगी व तद्अनुषंगीक पुर्वनियोजनकामी बैठकीबाबत.

संदर्भ:- जनहित याचिका क्र.१७३/२०१० मध्ये मे.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्देश.

गणेशोत्सवानिमित्त कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये व त्या दृष्टीने उपाययोजना करणेकामी गणेशोत्सव मंडळांना Online पद्धतीने एक खिडकी योजना अंमलात आणुन : http://pendal.maharts.com/Login ही वेबसाईट तयार करणेत आली आहे.

जनहित याचिका क्र.१७३/२०१० (डॉ. महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर संदर्भात मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशासन अनुसरुन पनवेल महानगरपालिकेने सार्वजनिक उत्सवानिमित्त उभारण्यात येणारे मंडप/स्टेज/कमानी इत्यादींबाबत सविस्तर कार्यपद्धती (S.O.P.) तयार केली आहे. सदर कार्यपद्धतीनुसार मार्गदर्शक सुचना देणेकामी, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात येत्या आगामी कालावधीत साजरा होणाऱ्या ''सार्वजनिक गणेशोत्सव २०२५'' करीता उत्सव साजरा करणारे संबंधित मंडळ/संस्था/व्यक्ती इत्यादी समवेत पनवेल महानगरपालिका हद्दीतील शासकीय अधिकारी/कर्मचारी (उपविभागीय अधिकारी, पनवेल, तहसिलदार पनवेल, पोलिस उपायुक्त, नवी मुंबई, व महानगरपालिका हद्दीतील सर्व वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मा.उपआयुक्त वाहतुक विभाग, नवी मुंबई, मा. पोलीस निरिक्षक वाहतुक विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अधिक्षक/अभियंता व इतर) संबंधित अग्निशमन अधिकारी आणि सर्व संबंधित प्रभागक्षेत्र अधिकारी यांची संयुक्त बैठक दिनांक ०५/०८/२०२५ रोजी वेळ सकाळी ११.३० वाजता आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. तरी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात ''सार्वजनिक गणेशोत्सव २०२५'' करीता उत्सव साजरा करणारे सर्व संबंधित मंडळ/संस्था/व्यक्ती यांनी दिनांक ०५/०८/२०२५ रोजी वेळ सकाळी ११.३० वाजता आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल या ठिकाणी आयोजित बैठकीस वेळेवर उपस्थित राहावे.

सही/-
**(रविकिरण घोडके)**
**उपायुक्त पनवेल महानगरपालिका**

जा.क्र. पमपा/परवाना/९९३/२०२५
दि.०१/०८/२०२५

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस ह्या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांने मौजे मारळ, ता. श्रीवर्धन, जि.रायगड येथील गट नं.३२९ एकूण क्षेत्र ००-०३-३०, आकार ०.०८ लागवड-गवतपड, गट नं.३२६. एकूण क्षेत्र ००-०६-३०, आकार ०.५६ लागवड- भात, व गट क्र.३२२ एकूण क्षेत्र ००-०४-३० आकार ०.३९ लागवड भात इतक्या क्षेत्राची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री.सुहास गजानन बोडस, श्री दिपक गजानन बोडस, श्रीम. सुजाता विश्वास वेळणकर, श्रीम. स्नेहा सुहास बाम, श्रीम.अश्विनी आनंद जोग, श्री.केशव सदाशिव बोडस, श्री.मोरेश्वर यज्ञेश्वर बोडस, श्रीम.सुमती पुरुषोत्तम बोडस, श्रीम.प्रतिभा अरुण शर्मा, श्रीम.अर्चना सुभाष कानिटकर, श्रीम. सुनिता भास्कर बोडस, श्री.महेंद्र भास्कर बोडस, श्री.राजेंद्र भास्कर बोडस, श्री.धनंजय जनार्दन बोडस, श्री.मकरंद जनार्दन बोडस, श्रीम.मिनल केदार पेडसे सर्व राहणार मु.मारळ, ता.श्रीवर्धन, जि.रायगड. यांच्याकडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची ठरवली आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या आशिलांनी संबंधीत जमिन मालकांसोबत केलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबेकब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी स्वरूपाचा दावा दाखल नाही.

वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा बयाणा, पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी ट्रस्ट, पोटगी वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसाचे आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक : २९/०७/२०२५

सही/-
**ॲड. अतुल अरविंद चौगुले**
B.L.S. LL.B
**खरेदीदाराचे वकील**

दि.०४/०८/२०२५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.गिरीधर वसंत पाटील व इतर ३ यांच्याकडून खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत हि निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| हाशिवरे ता.अलिबाग | ३३३/३ | क्षेत्र ०-९९-७०<br>पो.ख.०-०४-८०<br>एकुण १-०४-५० | ५.३१ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी क्षेत्र ०-४०-०० हे.आर. ही मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरच्या मिळकती निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
**ॲड.मानस सुधाकर पाटील**
मु.आंबेघर, पो.पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा. नं. ७७४३८०९६५३

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# सिराज-प्रसिधची मॅचविनिंग बॉलिंग

## भारताचा ६ धावांनी सनसनाटी विजय, इंग्लंडचा हिशोब क्लिअर

| मुंबई | वृत्तसंस्था |

मोहम्मद सिराज आणि प्रसिध कृष्णा या जोडीने केलेल्या चाबूक बॉलिंगमुळे टीम इंडियाने पाचव्या आणि अंतिम कसोटी सामन्यातील शेवटच्या दिवशी इंग्लंडवर ६ धावांनी सनसनाटी विजय मिळवला आहे. भारताने इंग्लंडसमोर ३७४ धावांचं आव्हान ठेवलं होतं. मात्र भारतीय गोलंदाजांनी इंग्लंडला ८५.१ ओव्हरमध्ये ३६७ धावांवर गुंडाळलं. यासह भारताने ५ सामन्यांची कसोटी मालिका २-२ ने बरोबरीत सोडवण्यात यश मिळवलं आहे. भारताच्या विजयात मोहम्मद सिराज याने प्रमुख भूमिका बजावली. सिराजने सर्वाधिक ५ विकेट्स घेतल्या. प्रसिधने इंग्लंडच्या ४ फलंदाजांना बाद केले.



इंग्लंडने ३६७ धावांचा पाठलाग करताना चौथ्या दिवशी ६ विकेट्स गमावून ७६.२ ओव्हरमध्ये३३९ धावा केल्या होत्या. त्यानंतर खराब प्रकाश आणि पावसामुळे चौथ्या दिवसाचा खेळ संपवण्यात आला. त्यामुळे आता इंग्लंडला पाचव्या आणि अंतिम दिवशी विजयासाठी ३५ धावांची गरज होती. तर दुखापतग्रस्त ख्रिस वोक्स खेळणार असल्याने भारताला ४ विकेट्सची गरज होती.

त्यानंतर चौथ्या दिवशी प्रसिध कृष्णा याने बेन डकेट याला ५४ धावांवर बाद करत इंग्लंडला दुसरा झटका दिला. सिराजने कर्णधार ओली पोप याला २७ धावावंर बाद केलं. त्यामुळे इंग्लंडची ३ बाद १०६ अशी स्थिती झाली. त्यानंतर जो रुट याची साथ देण्यासाठी हॅरी ब्रूक मैदानात आला. भारताला चौथी विकेटही मिळाली मात्र एक चूक झाली. सीमारेषेवर सिराजने हॅरीचा १९ धावांवर कॅच घेतला. मात्र त्यानंतर सिराजचा पाय हा बाऊंड्री लाईनला लागला. सिराजची एक चूक भारताला ९२ धावांनी महागात पडली. ब्रूकने शतक ठोकलं. इतकंच नाही तर रुट-ब्रूक जोडीने १९५ धावांची भागीदारी केली. भारताने इंग्लंडला ३०१ धावांवर चौथा झटका दिला. हॅरी ब्रूक १११ धावा करुन आऊट झाला. त्यामुळे टीम इंडिया या सामन्यातून पूर्णपणे बाहेर झाली होती. मात्र त्यानंतर भारतीय संघाने जोरदार कमबॅक केलं. भारताने जेकब बेथल ५ आणि जो रुट याला १०५ धावांवर आऊट केलं. त्यामुळे इंग्लंडची ६ आऊट ३३७ अशी स्थिती झाली. इंग्लंडने त्यानंतर २ धावा जोडल्या. इंग्लंडची धावसंख्या यासह ३३९ अशी झाली. त्यानंतर खराब प्रकाश आणि पावसामुळे चौथ्या दिवसाचा उर्वरित खेळ वाया गेला. त्यामुळे इंग्लंडला पाचव्या दिवशी ३५ धावा तर भारताला ३ विकेट्सची गरज होती. जो रुट याने गरज पडली तर क्रिस वोक्स मैदानात येईल, अंस चौथ्या दिवशी म्हटलं. त्यामुळे भारताला विजयासाठी चौथ्या दिवशी ३ ऐवजी ४ विकेट्स घ्याव्या लागतील हे निश्चित झालं.

### इंग्लंडचा दुसरा डाव

मोहम्मद सिराजने इंग्लंडला तिसऱ्या दिवसातील शेवटच्या सत्रात ५० धावांवर पहिला झटका दिला. सिराजने चौदाव्या षटकातील पाचव्या चेंडूवर (१३.५) ओव्ह झॅक क्रॉली याला १४ धावांवर बाद केलं. यासह तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला.

### पाचव्या दिवसाचा थरार

जेमी ओव्हरटन आणि जेमी स्मिथ ही जोडी मैदानात आली. भारताकडून प्रसिध कृष्णा याने पाचव्या दिवसातील पहिली ओव्हर टाकली. जेमीने प्रसिधच्या बॉलिंगवर २ फोरसह ८ धावा ठोकल्या. त्यामुळे भारताच्या विजयाची आशा मावळली. मात्र सिराजने इंग्लंडच्या डावातील ७८ आणि त्याच्या पाचव्या दिवसातील पहिल्याच ओव्हरमध्ये इंग्लंडला सातवा झटका दिला. सिराजने जेमी स्मिथला २ धावांवर विकेटकीपर ध्रुव जुरेलच्या हाती कॅच आऊट केलं. भारताने यासह कमॅबक केलं. सिराजने त्यानंतर जेमी ओव्हरटन याला ९ रन्सवर एलबीडब्ल्यू आऊट केलं. प्रसिधने जोश टंग याला झिरोवर बोल्ड करत इंग्लंडला नववा झटका दिला.

### फ्रॅक्चर हातासह क्रिस वोक्स

त्यानंतर फ्रॅक्चर झालेल्या हातासह क्रिस वोक्स मैदानात आला. वोक्सने गस एटकीन्सन याला चांगली साथ दिली. गसने निर्भीडपणे फटकेबाजी करण्याचा प्रयत्न केला. यात त्याने फटका मारला. आकाश दीप सीमारेषेपासून फार पुढे असल्याने त्याच्या हाताला लागून बॉल थेट बाहेर गेला. यासह इंग्लंडला आणि एटकीन्सनला ६ धावा मिळाल्या. त्यामुळे आता दोन्ही संघांच्या चाहत्यांची धाकधुक वाढली होती. त्यामुळे इंग्लंड जिंकणार की भारत जिंकणार? अशी उत्सूकता होती. मात्र इंग्लंडला ७ धावा हव्या असताना सिराजने गसला १७ धावांवर बोल्ड केलं. गस आऊट होताच इंग्लंडचा डाव आटोपला. भारताने यासह हा सामना जिंकला आणि ५ सामन्यांच्या मालिकेत २-२ ने बरोबरी साधत इंग्लंड दौऱ्याचा शेवट विजयाने केला.

### सामन्याचा धावता आढावा

इंग्लंडने टॉस जिंकला. इंग्लंडने भारताला फलंदाजीसाठी भाग पाडलं. भारताने करुण नायर याच्या अर्धशतकाच्या जोरावर २२४ धावा केल्या. त्यानंतर इंग्लंडने २४७ धावा करत २३ धावांची नाममात्र आघाडी घेतली. त्यानंतर यशस्वी जैस्वाल याचं शतक तर आकाश दीप, रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर या त्रिकुटाने केलेल्या अर्धशतकाच्या जोरावर भारताने दुसऱ्या डावात ३९६ धावांपर्यंत मजल मारली. त्यामुळे इंग्लंडला ३७४ धावांचं आव्हान मिळालं.

## निवडक



### अहाना सोमणला रौप्यपदक

**पुणे :** पनवेल ग्रामीण महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग असोसिएशनतर्फे जळगाव येथे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग स्पर्धा २०२५ मध्ये पनवेलच्या खेळाडूंनी रायगड जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. या स्पर्धेत अहाना सोमण, सई कारंडे आणि बतूल साखरवाला यांनी रौप्यपदके पटकावली, तर अनन्या डिंगोरकर हिने कांस्यपदक मिळवून पनवेल आणि रायगड जिल्ह्याची शान बाइबली. या खेळाडूंना प्रशिक्षक अद्वैत शेंबवणेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. विशेषतः महात्मा स्कूल ऑफ अकॅडमिक, पनवेलची विद्यार्थिनी असलेल्या अहाना सोमणने तिच्या पहिल्याच राज्यस्तरीय स्पर्धेत हे यश मिळवून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. स्पर्धेत ११ वर्षांखालील वयोगटात रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारी ती एकमेव खेळाडू होती. उपांत्य फेरीत तिने चंद्रपूरच्या आर्ची बच्चनपल्लीबार हिला मात देऊन अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला. अंतिम फेरीत तिचा सामना नागपूरच्या आदिती महाजन सोबत झाला, ज्यात तिला कडवा प्रतिकार करूनही पराभव पत्करावा लागला. मात्र, तिच्या पहिल्याच स्पर्धेत रौप्यपदक जिंकण्याची तिची कामगिरी अत्यंत प्रेरणादायी आहे. या युवा खेळाडूच्या बशाचे श्रेय त्यांच्या कठोर परिश्रम इसोबतच त्यांचे प्रशिक्षक अद्वैत शेंबवणेकर यांना जाते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी या स्पर्धेसाठी कसून सराव केला होता.

### मुरली श्रीशंकरची कोसानोव स्पर्धेत ७.९४ मीटरची झेप

**नवी दिल्ली :** भारताचा लांबउडीपटू मुरली श्रीशंकर याने सलग तिसऱ्या स्पर्धेमध्ये विजेता होण्याचा मान संपादन केला. कझाकस्तान येथील अल्माटी येथे झालेल्या कोसानोव मेमोरियल ॲथलेटिक्स स्पर्धेत त्याने यश संपादन केले.



मागील वर्षी एप्रिल महिन्यात मुरली श्रीशंकर याच्या गुडघ्याला दुखापत झाली होती. यामुळे पॅरिस ऑलिंपिकलाही तो मुकला होता. दुखापतीवर मात केल्यानंतर त्याने झोकात पुनरागमन केले. पुणे येथे झालेल्या इंडियन ओपन स्पर्धेमध्ये त्याने ८.०५ मीटर लांब उडी मारत विजेतेपदकावर नाव कोरले होते. पोर्तुगालमधील स्पर्धेमध्ये त्याने ७.७५ मीटर लांब उडी मारत पुन्हा एकदा विजयी होण्याचा मान मिळवला. आता त्याने कझाकस्तान येथील स्पर्धेमध्ये ७.९४ मीटर लांब उडी मारत पहिले स्थान पटकावले. दरम्यान, टोकियो येथे जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत पात्रतेसाठी ८.२७ मीटर लांब उडी मारणे गरजेचे आहे. मुरली श्रीशंकर याला अद्याप या स्पर्धेची पात्रता मिळवता आलेली नाही. तसेच मुरली श्रीशंकर याला दुखापत होण्याआधी त्याने आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये पदक विजेती कामगिरी केली होती.

### बुमराह आशिया कपमधून बाहेर

**मुंबई :** भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह याला इंग्लंड विरूद्धच्या पाचव्या आणि अंतिम कसोटी सामन्यातील दुसऱ्या दिवशी रिलीज करण्यात आलं. जसप्रीत बुमराह आशिया कप स्पर्धेत खेळणार नाही, असा दावा केला जात आहे. बुमराह आशिया कप स्पर्धा किंवा विंडीज विरूद्धची कसोटी मालिका यापैकी एकाचीच निवड करेल, असं म्हटलं जात आहे. आशिया कप स्पर्धेला ९ सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. तर त्यानंतर टीम इंडिया विंडीज विरुद्ध मायदेशात २ सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. बुमराह आशिया कप स्पर्धेत खेळल्यास त्याला १ महिन्यासाठी विश्रांती दिली जाऊ शकते. बुमराह त्यानंतर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध २ सामन्यांच्या कसोटी मालिकेत खेळताना दिसू शकतो. याबाबतचा निर्णय निवड समिती अध्यक्ष अजित आगरकर आणि हेड कोच गौतम गंभीर घेतील. हा निर्णय फार महत्त्वाचा ठरणार आहे. कारण बुमराहचा टेस्ट क्रिकेट आवडता फॉर्मेट आहे. तसेच वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप २०२५-२०२७ या साखळीत पॉइंट्स मिळवणंही संघासाठी महत्त्वाचं आहे. त्यासाठी संघात बुमराह असणं महत्त्वाचं आहे. तसेच बुमराह नववर्षात न्यूझीलंड विरुद्ध टी २० मालिका खेळू शकतो, असंही सूत्रांनी म्हटलं.

## ११३७ कोटींच्या मोहिमेसाठी सारा तेंडुलकरची निवड

| मुंबई | वृत्तसंस्था|

दिग्गज आजी-माजी क्रिकेटपटूंच्या स्टारकिड्सपैकी सर्वाधिक चर्चेत असणारी म्हणजे सचिन तेंडुलकरची मुलगी सारा तेंडुलकर. सध्या ती ११३७ कोटींच्या एका प्रोजेक्टमुळे चर्चेत आली आहे.



सारा तेंडुलकर ही एका खूप मोठ्या मोहिमेचा भाग होणार आहे. ही मोहीम ऑस्ट्रेलियाशी संबंधित आहे. सारा तेंडुलकर त्या मोहिमेचा भाग बनून ऑस्ट्रेलियाला मदत करणार आहे. ऑस्ट्रेलियाची ही नवी मोहिम तब्बल ११३७ कोटी रुपयांची असून, सारा त्याचा भाग असणार आहे.

या पर्यटन मोहिमेसाठी ऑस्ट्रेलियाने प्रत्येक देशातून एक चेहरा निवडला आहे. जेणेकरून त्या देशांतील लोक ऑस्ट्रेलियाला जास्तीत जास्त भेट देण्यासाठी येतील आणि ऑस्ट्रेलियाचे पर्यटनातून मिळणारे उत्पन्नही वाढेल.

## खोपोली येथे आरडीसीए आयोजित पंच शिबिरामध्ये मार्गदर्शन

| पोयनाड | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने खोपोली येथील आरडीसीएचे उपाध्यक्ष यशवंत साबळे यांच्या महाराजा बँक्वेट हॉलमध्ये रायगड जिल्ह्यातील क्रिकेट पंचांच्या दुसऱ्या सत्राच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये रायगड जिल्ह्यातील पंचांना मार्गदर्शन करण्यासाठी माजी रणजीपटू व विद्यमान बीसीसीआयचे पंच हर्षद रावले, मुंबई क्रिकेट असो.चे पंच राजन कसबे, क्रिकेट नियमांचे तज्ञ नयन कट्टा उपस्थित होते.



शिबिरामध्ये जिल्ह्यातील ५० पंचांनी सहभाग घेतला असून शिबीर एकूण १०० दिवस ऑनलाइन व प्रत्यक्ष कार्यशाळा वर्ग घेऊन सुरू आहे. रायगड पंच पॅनलची परीक्षा २३ ऑगस्ट रोजी होणार आहे. खोपोली येथील पंच शिबिरामध्ये एमसीसी क्रिकेट लॉ, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या एकदिवसीय, टी-२० व मल्टी डेज क्रिकेट सामन्यांच्या नियमांसह अन्य नवीन नियमांचे प्रात्यक्षिक काशी क्रिकेट अकॅडमीच्या टर्फवर करून दाखवण्यात आली व सर्व नियम समजावून सांगण्यात आले. आरडीसीएचे उपाध्यक्ष यशवंत साबळे, सदस्य कौस्तुभ जोशी यांनी गतवर्षी आरडीसीए तर्फे सर्व वयोगटातील मुलामुलींच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून सर्व मिळून जवळपास ३२५ सामन्यांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती दिली, तसेच महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित सोळा वर्षाखालील मुलांच्या आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेतील १५ दोनदिवसीय सामन्यांचे आयोजन रायगड जिल्ह्यात करण्यात आले असल्याचेही सांगीतले.

## भारताच्या पूर्वा घियाची अपूर्वाई!

### फ्रीडायव्हिंग क्रीडा प्रकारात उत्तुंग भरारी

| पुणे | वृत्तसंस्था |

तिने रुपेरी दुनियेत सिनेछायाचित्रकार म्हणून भरारी घेतली. मग तिला प्रत्यक्ष उड्डाणाने खुणावले. अशा वैविध्यपूर्ण छंदाची अपूर्वाई प्रदर्शित करणाऱ्या तरुणीचे नाव आहे पूर्वा घिया. सिनेछायाचित्रकार म्हणून पूर्वाने वैशिष्ट्यपूर्ण कथा साकारल्या.



तिला फ्रीडायव्हिंग नावाच्या अफाट अशा साहसी क्रीडाप्रकाराने खुणावले. छंदाचा ध्यास घ्यायचा आणि मग त्यासाठी झटायची मनोवृत्ती तिने या क्षेत्रातही प्रदर्शित केली. या क्षेत्रात तर तिने आंतरराष्ट्रीय पातळीवर भरारी घेतली. फिलिपिन्समधील पँग्लाओ बेटावर पार पडलेल्या आशियाई फ्रीडायव्हिंग स्पर्धेत तिने भारताचे प्रतिनिधित्व केले. या क्रीडा प्रकारात या पातळीवर भारतीय महिलांचा ठसा अधोरेखित करताना राष्ट्रीय उच्चांक प्रस्थापित केले. याआधीचा उच्चांक अर्चना शंकरनारायण आणि अर्चना त्यागराजन यांच्या नावावर होता. आशियाई फ्रीडायव्हिंग करंडक स्पर्धेत सहभागी झालेली पूर्वा भारताची पहिली भारतीय महिला ठरली. फ्रीडायव्हिंगमधील हा प्रकार अत्यंत आव्हानात्मक मानला जातो. यात एका श्वासात अधिकाधिक खोलवर डायव्हिंग करायचे असते. यात स्पर्धकाचा दमसास, चिकाटी आणि मनोधैर्य पणास लागते.

वास्तविक पूर्वा इन्स्ट्रक्टर होण्यासाठी फिलीपीन्सला गेली होती. तिने सांगितले की, या खेळात तुमचे शरीर कसे प्रतिसाद देते, हे समजणे महत्त्वाचे असते. मी एक क्रीडापटू म्हणून कौशल्याची दोन महिन्यांत पायाभरणी केली.

चित्रपटसृष्टीत मला पाण्याखाली छायाचित्रणाचे आव्हान पेलायचे होते. त्याची पूर्वतयारी म्हणून मी स्कुबा डायव्हिंग शिकू लागले. पाण्याखालील विश्वाने मला मोहित केले. दोन महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर मी स्पर्धेत भाग घेण्याचा संकल्प सोडला. कामगिरीबाबत उच्चांकाचे उद्दिष्ट किंवा दडपण नव्हते. माझ्या कामगिरीमुळे देशातील तरुणींना प्रेरणा मिळावी, याच उद्देशाने मी या क्षेत्रात उडी घेतली.

## इंटर मियामीचा कर्णधार लिओनेल मेस्सी जखमी

**मेक्सिको :** मेस्सी उजव्या स्नायूच्या दुखापतीमुळे अनिश्चित काळासाठी बाहेर पडला आहे, अशी पुष्टी क्लबने अधिकृत निवेदनात केली आहे. मेक्सिकन संघ नेकाक्सा विरुद्ध लीग कप सामन्यादरम्यान मेस्सीला ही दुखापत झाली. मेस्सीच्या दुखापतीनंतरही, इंटर मियामीने नेकाक्सा विरुद्ध पेनल्टी शूटआउटमध्ये ५-४ असा विजय मिळवला.



मेस्सीला अवघ्या ११ व्या मिनिटाला मैदान सोडावे लागले. तो स्वतःच्या पायाने लॉकर रूममध्ये गेला असला तरी, दुखापतीची तीव्रता लक्षात घेऊन त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. इंटर मियामीच्या निवेदनानुसार, मेस्सीच्या उजव्या पायाच्या स्नायूला किरकोळ दुखापत झाल्याची पुष्टी अहवालात करण्यात आली आहे. त्याची वैद्यकीय स्थिती आणि उपचारांना मिळालेल्या प्रतिसादाच्या आधारे त्याला खेळण्याची परवानगी दिली जाईल. मेस्सीने या हंगामात इंटर मियामीसाठी १८ सामन्यांमध्ये १८ गोल आणि ९ असिस्ट केले आहेत. तो सध्या एमएलएसमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत अव्वल स्थानावर आहे.

### जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा गाजवणार | कल्याणची कन्या करणार भारताचे प्रतिनिधीत्व

## मराठमोळ्या वैष्णवीची उत्तुंग झेप

| नवी दिल्ली| वृत्तसंस्था |

कल्याणमधील मराठमोळी कन्या वैष्णवी पाटील हिने उत्तुंग झेप घेतली आहे. निवड चाचणीमध्ये उल्लेखनीय कामगिरी करीत तिने जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेमध्ये प्रवेश केला. आता १३ ते २१ सप्टेंबर रोजी झॅगरेब येथे होत असलेल्या प्रतिष्ठेच्या स्पर्धेतील ६५ किलो वजनी गटात ती भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.

निवड चाचणी ते जागतिक स्पर्धा असा प्रवास करणाऱ्या वैष्णवी पाटील हिने याप्रसंगी आपले मत व्यक्त करताना म्हटले की, मी २०२० मध्ये कुस्तीला सुरुवात केली. त्याआधी मी चिखलातील कुस्ती खेळत असे. साक्षी मलिक हिने २०१६ मधील रिओ ऑलिंपिकमध्ये पदक पटकावले, हे मी बघितले. त्यानंतर या खेळामध्ये करिअर करण्याचे ठरवले. माझे वडील ढाबा चालवतात. तसेच आई घर सांभाळते. माझ्यासाठी दोघेही अपार मेहनत घेत आहेत..

वैष्णवी पाटील हिने अमेरिकेची कुस्तीपटू हेलेन मरॉलिस हिच्याकडून प्रेरणा घेतली आहे. वैष्णवी याप्रसंगी म्हणाली की, हेलेन मरॉलिस हिने २०१६ मधील ऑलिंपिकमध्ये विजेता होण्याचा मान संपादन केला..त्यानंतर टोकियो व पॅरिस ऑलिंपकमध्येही तिने ब्राँझपदकांची कमाई केली. मी तिच्या लढती यूट्युबवर बघते. जागतिक स्पर्धेमध्ये पदक जिंकण्याचा मला विश्वास आहे. तसेच ऑलिंपिकमध्ये पदक पटकावण्याचे स्वप्न मी बघितले आहे.



वैष्णवी पाटील ही जसबीर यांच्याकडून कुस्ती या खेळातील बारकावे आत्मसात करते. याप्रसंगी जसबीर यांच्याकडून तिच्या खेळाचे कौतुक करण्यात आले. ते म्हणाले की, वैष्णवी सुरुवातीला दोन ते तीन महिन्यांसाठी हरियाना येथील हिसार येथे होत होती. त्यानंतर पुन्हा आपल्या निवासस्थानी जात असे. तेव्हा मी तिच्या कुटुंबीयांना सांगितले की, तिला एक वर्षासाठी येथे सराव करायला पाठवा. वैष्णवीच्या पालकांनी माझे ऐकले. वैष्णवीकडे शिस्तबद्धता आहे. ती मेहनती आहे. ती तांत्रिकदृष्ट्या सक्षम आहे. तिची आक्रमक खेळण्याची पद्धत छान आहे. जागतिक स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. यावरूनच तिच्या कौशल्याची जाणीव होते. आता आगामी स्पर्धेतही तिच्याकडून पदक विजेती कामगिरीची आशा बाळगली जाणार आहे. वैष्णवी पाटील हिने सरावासाठी महाराष्ट्रातून हरियाना येथे जाणे पसंत केले, मात्र तिने दोन राज्यांमधील फरक सांगितला. ती म्हणाली, हरियाना येथे मांसाहारी कमी प्रमाणात आहेत. हरियाना येथे दूध, दही, घी हे जास्त प्रमाणात खाल्ले जाते. माझ्या डाएटमध्येही याचेच प्रमाण आहे, पण मी मांसाहारी खाणे सोडलेले नाही. तसेच हरियानवी भाषाही मला समजू लागली आहे.

जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी भारतीय महिला संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघामध्ये कल्याणच्या वैष्णवी पाटील हिच्यासह आणखी काही खेळाडूंचा समावेश आहे. अंकुश, अंतिम पंघाल, निशू, तपस्या, नेहा सांगवान, मनीषा भानवाला, राधिका, ज्योती बेरवाल, प्रिया मलिक या खेळाडूंनी संधी देण्यात आली आहे. आता जागतिक स्पर्धेमध्ये या खेळाडूंवर भारताची मदार असणार आहे.

१६ वा स्मृतिदिन



कै. कमळाकर गजानन पाटील
मृत्यू ०५-०८-२००९

शोकाकुल :- मुलगा-शैलेश कमळाकर पाटील
पत्नी, भाऊ, मुली, सुना
मु.पो. किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)